
शनिवार **माणूस** मूल्य
११ जानेवारी १९७५ एक रुपया

किर्लोस्कर–स्त्री ही आधुनिक महाराष्ट्राची पहिली यशस्वी कौटुंबिक मासिके. काही मासिके वा नियतकालिके कशाला तरी वाहिलेली असतात, एखाद्या तत्त्वाचा, विशिष्ट आचार–विचारांचा आग्रही पुरस्कार हा त्यांचा हेतू असतो. त्यामुळे त्यांचा वाचकवर्ग मर्यादित राहतो, ती एकसुरी व कंटाळवाणी होतात, बहुधा अल्पायुषी ठरतात. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पृष्ठ २ वर



# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे | मुखपृष्ठ |
|---|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ११ जानेवारी | अंक : तेहेतिसावा | ग. ना. जाधव |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया | |


# शं. वा. कि. घराणे

किर्लोस्कर–स्त्री ही आधुनिक महाराष्ट्राची पहिली यशस्वी कौटुंबिक मासिके. काही मासिके वा नियतकालिके कशाला तरी वाहिलेली असतात, एखाद्या तत्त्वाचा, विशिष्ट आचार–विचाराचा आग्रही पुरस्कार हा त्याचा हेतू असतो. त्यामुळे त्याचा वाचकवर्ग मर्यादित राहतो, ती एकसुरी व कंटाळवाणी होतात, बहुधा अल्पायुषी ठरतात. दीर्घकाल टिकली तरी व्यावहारिकदृष्ट्या ती फारशी यशस्वी होत नाहीत. कौटुंबिक नियतकालिकाची स्थिती नेमकी याउलट असते. समाजातील सर्व थरात, एका थरातल्यासुद्धा वेगवेगळ्या मनोगटात पोचण्याची या नियतकालिकाची धडपड असते व त्यामुळे कुठल्याही एका तत्त्वाला, प्रवृत्तीला किंवा संप्रदायाला बांधून न घेता विविधता व नाविन्य या बळावर ती आपले व्यापक अस्तित्व टिकवून धरतात. लोकप्रिय व यशस्वी होतात. वाहिलेल्या नियतकालिकापेक्षा या चाललेल्या नियतकालिकाचे संपादन अवघड असते. फार कसरतीचे असते. चौफेरपणा, मोकळी व सतेज दृष्टी, नाविन्याचा सतत शोध आणि त्याबरोबरच एकप्रकारची प्रमाणशुद्ध विचारसरणी हे अशा चालू नियतकालिकाचे मुख्य भांडवल असते. शं. वा. कि.जवळ या भांडवलाचा साठा भरपूर प्रमाणात होता. म्हणूनच ते किर्लोस्कर–स्त्री मासिकांची संपादनधुरा दोन तपाहून अधिक काळ यशस्वीरीत्या पेलू शकले. मराठी कुटुंबांच्या घराघरातून त्यांनी आपली मासिके पोचवली. किर्लोस्करांचे अनुकरण करून त्याकाळी एकदोन कारखानदारांनी आपलीही मासिके काढण्याचा प्रयोग करून पाहिला. पण केवळ पैसा उपलब्ध झाला, शं. वा कि. सारखा संपादक या मासिकांना लाभला नाही. त्यामुळे हे उसने प्रयोग लवकरच बंद पडले. किर्लोस्कर मासिके मात्र सतत वाढत राहिली; नवेनवे उपक्रम, वादविषय, चळवळी हाती घेऊन शं. वा. कि नी अखेरीस ती आधुनिक महाराष्ट्रीय कुटुंबातील एक घटक, प्रेमळ मित्र व सल्लागार या उंचीला आणून ठेवली. तत्पूर्वी असे कौटुंबिक मासिक यशस्वीरीत्या कुणी चालवलेले नव्हते. साहित्यापासून राजकारणापर्यंत आणि चुलीपासून युद्धापर्यंत सर्व विषयांचा नेटका, आकर्षक पण भारदस्त पद्धतीने परामर्ष घेत राहिल्यामुळे किर्लोस्कर मासिकाना हे वैभव प्राप्त झाले. सुधारणावादाचा अंगिकार केल्यामुळे या वैभवालाही स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे एक तेज चढले. अशी जोड क्वचित जमते लोकप्रियता आणि स्वतंत्र व वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्व सहसा एकत्र आढळत नाही. शं. वा. कि.च्या ठिकाणी मात्र ही जोड व्यवस्थित जमून आलेली होती. त्यामुळे मराठी नियतकालिकाच्या दुनियेत किर्लोस्कर मासिकानी आपले असे एक स्वतंत्र व मातबर घराणे स्थापन केले व अजूनही या घराण्याला तसा पर्याय मराठीत उपलब्ध नाही. तीन–तीन मासिकांची त्रिकुटे अनेक निघाली, पण किर्लोस्करी त्रिकुटाला धक्का लागला नाही. शं. वा. कि.चे चतुरस्र संपादन आणि उत्तम व्यवस्थापन यामुळे हे भाग्य या त्रिकुटाला लाभले हे उघड आहे.

शं. वा. कि. एक कारखानदार होते; चित्रकार–लेखक म्हणूनही ते गाजले. परंतु त्यांची छाप मात्र नियतकालिकांच्या क्षेत्रात उमटली. कुठल्याही एका प्रवृत्तीकडे, वादाकडे न कलंडलेले, कुटुंबातील सर्व घटकासाठी असलेले मासिक प्रथम शं. वा. कि. नी मराठीत आणले आणि सुप्रतिष्ठित केले. ही त्याची कामगिरी मराठी नियतकालिकांच्या सृष्टीत नोंदली जावी इतक्या महत्त्वाची आहे. 'शवाकीय' हे या दृष्टीने टाकले गेलेले एक उचित पाऊल होते. आणखीही अशी काही पाउले टाकली गेली तर मराठी वाचक त्याचे निश्चितच स्वागत करतील. कारण शं. वा. कि. हे नाव मराठी कुटुंबात यापुढेही एक आदराने घेतले जाणारे नाव म्हणून कायम राहणार आहे. अशी एक आदरस्थानी चिरकाल राहणारी संपादक व्यक्ती म्हणून 'माणूस' शंवाकिंना अभिवादन करीत आहे.

–संपादक

## एक आठवण

शंकरभाऊंना भेटण्यासाठी मी फार दिवसापूर्वी एकदा किर्लोस्करवाडीला गेलो होतो. असेल ५७ किंवा ५८ साल. दुपारी किर्लोस्कर प्रेसमध्ये मुकुंदरावांशी गप्पा मारल्या. सध्याकाळी मी, मुकुंदराव आणि शंकरभाऊ फिरायला बाहेर पडलो. गांधी खुनानंतरच्या जाळपोळीचा विषय निघाला. वाडीवर जमाव कसा, कुठून चालून आला ते शंकरभाऊ सांगत होते. त्या त्या जागा दाखवीत होते. मला आश्चर्य वाटले, आदर वाटला तो एका गोष्टीचा. जमाव आला तेव्हा शंकरभाऊ घरात दारेखिडक्या लावून बसून राहिले नाहीत, मागील दाराने निघून गेले नाहीत किंवा संरक्षणासाठी त्यांनी पोलिसांची मदत वगैरेही मागवली नाही. ते निर्भयपणे जमावाला सामोरे गेले. प्रसंगावधान राखून समजुतीच्या चार गोष्टी त्यानी जमावाला सांगितल्या. जाळपोळ करायला आलेला संतप्त जमाव शंकरभाऊंच्या भाषणामुळे शांत झाला. आला तसा शेवटी निघूनही गेला. कुठून आले हे धैर्य शंकरभाऊजवळ ऐनवेळी ?

शंकरभाऊंचे आसपासच्या भागातील लोकांशी गावागावाशी जिव्हाळ्याचे संबंध होते.

**–श्री. ग. मा.**

**मुक्काम : ईडन गार्डन्स, कलकत्ता**

# आता डोळे व कान मद्रासकडे

**वसंत पोतदार**



नूतन वर्षदिनी अटळ मध्यान्ही ७० हजार मुखातील ‘हुर्यो’…ने व १ लक्ष ४० हजार करतलध्वनीने कलकत्त्यातील ईडन गार्डन्सचा आसमंत दणाणून सोडला. मागे ‘माणूस’मध्ये याच मैदानावर इंग्लंडविरूद्ध भारताच्या विजयानंतर मी लिहिलेलं स्मरतं की भुक्या कंगाल बंगालमध्ये खेळपट्टीचं चुंबन घेऊन त्यावर लोळणाऱ्या जनसमूहाला पाहून मी आनंदाने अक्षरशः रडत होतो. आजच्या प्रसंगी अश्रु उमाळत होते पण डोळ्यांची कवाडं उघडण्या इतपत नव्हे. कारण आज ‘पब्लिक’ला मैदानात घुसण्याचा व त्यामुळे बेभान होऊन हर्ष व्यक्त करण्याचा वाव दिला गेला नाही.

२२४ वर ९ बाद असताना ठीक ११ वाजून ५५ मिनिटांवर बिशनसिंग बेदीनं रॉबर्टसचा त्रिफाळा उडवला. आम्ही उभे राहून टाळ्या कुटण्यापूर्वीच खेळाडू पळून गेले व क्षणार्धात मैदानाचं स्वरूप पालटलं. प्रजासत्ताक दिनी लुटुपुटीच्या लढाईनिमित्त फौजी भाई जसे मोर्चे राखण्याचे शिस्तबद्ध संचालन दाखवतात तसे बंगाल पोलीसने केले. एका हातात लोखंडी जाळी व दुसऱ्या हातात दंडुका घेऊन ५०० पोलीस मैदानात शिरले व खेळाडूंच्या तंबूच्या दुतर्फा आणि खेळपट्टीभोवती युद्धशिस्तीने सज्ज उभे ठाकले. ७० हजार प्रेक्षक या दृष्यानेच असाहय झाले. बंगाल तंत्रविद्येचं माहेरघर! लगेच आनंद व्यक्त करण्यासाठी वृत्तपत्रे जाळण्याचा अघोरी उपाय सुरू झाला. एका मुलाने तर कमालच केली. सगळ्यात उंच स्टँडच्या माथ्यावर १० फूट उंचीच्या बोरोलीन जाहिरातीवर तो चढला व शर्ट काढून गोफणीसारखा फिरवू लागला. फोटोग्राफरांचं कोंडाळं लगेच त्या दिशेला धावत सुटलं. आम्ही एसोसिएटेड मेंबर्स स्टँडमधून तिकडे बघत असताना कुणी तरी किंचाळलं, ‘ओई तो मानूदा’…(ते पहा मानूदा) एकेकाळचे क्रिकेटपटु (कलकत्त्या पुरतेच) मानूदा ब्लेझर व पँट या पोशाखात आम्हाला हात जोडून बसण्याची विनंती करीत होते. सोबत पोलीस कमिशनर, ४–२ मंत्री व अलबत्त्या गलबत्त्यांचा गोतावळा. लगेच होई चोई च्या आरोळ्या सुरू झाल्या. त्यातच कुणी तरी ओरडलं, ‘मानूदा, कालकेर छूटीर घोषणा करून’ अन मग सगळ्यांनी बुलाबाई लेकीच्या स्वरात समूह घोषणा सुरू केल्या की उद्याची सुट्टी दिलीच पाहिजे! मानूदाने लगेच होकार दिला. अप्रतिम दिसत होते ते! कोण हे मानूदा? देशबंधू चित्तरंजन दासचे नातू व बंगालचे विद्यमान मुख्यमंत्री श्री सिद्धार्थ शंकर राय!

२५ डिसेंबरला दुपारी मी कलकत्त्याला पोहोचलो व संध्याकाळपर्यंत तिकिट-विक्रीच्या गोष्टी ऐकून थंडगार पडलो. अगदी गडगंज धनीकही कोणत्याही दरावर तिकीट मिळवू शकत नव्हते ही अवस्था होती. माझा एक कवी मित्र आय. ए. एस. आहे. त्यानेच मागल्या वेळीही कॉम्प्लिमेंटरी पास दिला होता व यावेळीही राखून ठेवला होता. त्यामुळे मी निर्स्वित होतो. २५ तारखेच्या वृत्तपत्रात क्रीडामंत्री प्रकुल्लकांतो घोषजवळ १९०० तिकिट व २०० कॉम्प्लिमेंटरी पासेस असल्याची खळबळजनक बातमी फुटली व जनतेचा राग अनावर झाला. मजेची बात ही की प्रफुल्लकांती बंगालचे अन्नमंत्रीही आहेत. अन्न व क्रीडाखाते एकाच मंत्र्याला देऊन अप्रतिम प्रतीक साधले कलाप्रिय बंगालने! कारण खाद्याचा अभाव हाच

एक वर्षानुवर्षांचा खेळ होऊन बसला आहे या देशात ! या बातमीनंतर २६ डिसेंबरला खाद्य–क्रीडामंत्री सचिवालयात गेलेच नाहीत. समस्त मंत्री व आमदार त्यांच्या दरवाजावर टाळे पाहून पाय आपटीत परतत होते. मंत्र्याला माणशी १० व आमदाराला माणशी २ तिकिटे हे राशन कबूल करण्यात आले होते. खेळाशी सुतराम संबंध नसूनही काय हा प्रचंड प्रिव्हिलेज !

### इंग्लंड–भारत एकाच प्रवाहात

भारत–वेस्टइंडीज व इंग्लंड–ऑस्ट्रेलियामधील कसोटी सामने एकाचवेळी सुरू झालेत. पहिल्या सामन्यात आमचा धावांनी पराभव झाला– इग्लंडचाही ! दुसऱ्यात वेस्टइंडीज गडी राखून जिंकली, ऑस्ट्रेलियाही ! अन् तिसऱ्या सामन्यातील पहिल्या डावात इंग्लंडची एक धावेने आघाडी व आमची फक्त ७ धावांनी पिछाडी ! कलकत्त्याचा सामना बघताना व वृत्तपत्रातून तिकडच्या सामन्याचे समाचार वाचताना सारखे असे वाटत होते की इंग्लडने सामना जिंकला तर आम्हीही जिंकूच ! आम्ही जिंकलो पण इंग्लडला ‘ ड्रा ’ वर समाधान मानावे लागले !

### आता खेळाबद्दल

साप्ताहिकात आमूल आकडेवारी देण्याची गरज नाही. पहिल्या दिवशी आमच्या २३३ धावा तर दुसऱ्या दिवशी त्यांच्या २४० धावा ! तिसऱ्या दिवसाच्या शेवटी दुसऱ्या डावात भारत ६ गडी बाद २०६ ! त्यानंतरचा विश्रामदिन. त्यादिवशी उभ्या कलकत्त्यात उद्या काय होईल याशिवाय बात नव्हती. दुर्गापूजेनंतर लोकोत्साहाचा दुसरा सोहळा क्रिकेट टेस्ट मॅच ! हे ६ दिवस समस्त कलकत्ता क्रिकेटलोकी (विष्णूलोक टाइप) रममाण असते. शबनमसिंचित हिरवळीवर पहिला अर्धातास विश्वनाथ व घावरी होल्डर, राबर्टस व ज्युलियन समोर टिकतील काय ? या प्रश्नरोगाने सारेच पछाडले होते. चौथ्या दिवसाचा खेळ सुरू झाला त्या क्षणापासून छाती धडधडू लागली. पण हे धाकधुकीचे धुके काही मिनिटातच छटले. विश्वनाथचे अविस्मरणीय शतक अन त्याहूनही महत्त्वपूर्ण करसन घावरीने पहिल्याच कसोटी सामन्यात दाखवलेली निर्भयता यानी भारताची नैय्या ३१६ धावाच्या किनाऱ्यावर आणून लावली. आणिबाणीच्या प्रसंगी कमी धावावर बाद होण्याच्या दुःखापेक्षा खेळपट्टीपासून तंबूपर्यंत परतताना लाखाहून अधिक डोळे आपल्यावर लागलेले आहेत या जाणीवेने कसलेले अनुभवी क्रिकेटपटूही पार नर्व्हस होऊन जातात. मग घावरी तर अगदीच नवशिक्का ! पण तोलून मापून खेळला अन् एक षटकारही ठोकला. सौराष्ट्रातील राजकोटनगरवासी घावरीचे भविष्य नक्कीच उज्वल आहे कारण त्याच्यात व्यावसायिक खेळाडूची नर्व्ह आहे जी या दलातील इतर फक्त ३ खेळाडूनी अर्जित केली आहे–इंजिनिअर, विश्वनाथ, बेदी !

पण ३१६ धावा म्हणजे जणू ५१६ या ऐटीत भारतीय संघ चौथ्या दिवशी दुपारी क्षेत्ररक्षणासाठी उतरला. दिवस सपेपर्यंत वेस्टइंडीजने ३ गडी बाद १४६ धावाची मजल मारली. सुस्त क्षेत्ररक्षण, उत्तम झेल व खुबीदार अधिनायकत्व असतं तर फक्त १०० धावावर किमान ४ गडी बाद झाले असते. पण ते होणें नव्हते. पतौडीने क्षेत्ररक्षकांना अस्थानी उभे केले, कारण नसताना गोलंदाजीत वारवार बदल केले, गायकवाडने दोनदा ओव्हर थ्रो विनाकारण केले, अन सर्वात धक्का देणारी घटना म्हणजे शतकवीर विश्वनाथने कालीचरणचा स्लिपमध्ये सोडलेला झेल–त्यावेळी कालीचरणच्या फक्त ६ धावा झाल्या होत्या.

### वैऱ्याची रात्र – सारा बंगाल जागा

ग्रिनिच, फेडरीक्स व रिचर्डस बाद. अजून ७ खेळाडू बाकी, त्यात परिपूर्ण फलदाज कालीचरण. चेंडूची शिवण उघडणारा फटकेबाज लॉईड व दुसरा सोबर्स म्हणून नावाजलेला ज्यूलियन. ३३० मिनिटाचा खेळ व फक्त १६४ धावाची जरूरी ! लोक सर्वत्र कोडाळी करून हे अशक्य त्रैराशिक सोडवण्यासाठी डोकी खाजवीत होते सारी रात ! हिरवळ हवी तितकी बिघडली नव्हती, कलकत्त्यात तोडी लावण्याइतपतच थंडी म्हणजे दवसुद्धा नावापुरतेच अन लॉईडसारखा खतरनाक फलदाज मैदानात. विजयाची एकमात्र आशा चंद्रशेखरच्या मोडक्या मनगटाचा तुघलकी घुमाव–अन याच आशेवर तग धरून, श्वास रोखून आम्ही स्टँडमधे बसलो. पहिले षटक बेदीने टाकले. दुसरीकडून चंद्रशेखर आला. एक–दोन–तीन षटके त्याने फेकली पण परिणाम नाही. उलट लॉईडने ३ चौकर मारून सर्वांच्या तोंडचे पाणी पळवले. लोक पतौडीच्या नावाने ओरडू लागले, “ अरे प्रोशोन्नके दे ” पतौडीवर बंगाल्यांचा जन्मसिद्ध हक्क असे त्याचे मत, कारण तो बंगालचा जावई ! अन प्रसन्नवर नितात विश्वास, कारण त्याची पत्नी सौभाग्यवती सीमा बंगालचीच ललना. पण पतौडीने पब्लिकच्या आरडाओरडीकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. चंद्राने चौथे षटक सुरू केले अन १० वाजून २३ मिनिटावर लॉईडचा चक्क त्रिफळा उडवला ( १६३।४ ). त्या क्षणाचा आनद व्यक्त करणारी भाषा निदान मजजवळ नाही. २८ धावा काढून अगदी खाली मान घालून विरोधी कर्णधार अन्तर्धान पावला. हा पर्वताकार अडथळा दूर होताच प्रेक्षक कालीचरणच्या मागे लागले. प्रत्येक चेंडूवर हो ऽऽऽई ची आरोळी व अगणित घटानाद होऊ लागले. याच गोड क्रिकेटपटूची सर्वमुखी प्रशंसा ऐकून सामन्याच्या दुसऱ्या दिवशी अगदी म्हाताऱ्याकोताऱ्यांसकट सारा कलकत्ता क्रीडांगणावर लोटला होता. याला कारणे ३. एक–त्याचा अप्रतिम कलात्मक खेळ, दोन–त्याच्या नावात बंगालचे प्रमुख दैवत, तीन–त्याचे आजोबा खूप वर्षे बंगाल प्रांतात वास्तव्य करून होते. बंगाल्याचे त्याच्या भाषेवर व मातीवर असेच विक्षिप्त प्रेम आहे. उद्या एखाद्या तरण्याबांड, अगदी नुकतीच नोकरी मिळालेल्या बंगाल्याला साक्षात यमाने येऊन बंगालीत ‘ तुला घेऊन जायला आलोय ’ म्हटले तर तो सानदे कोलांटचा उड्या मारीत जाईल.

पहिल्या डावात तोच लाडका कालीदा शून्य धावावर तिसऱ्याच चेंडूवर झेलबाद झाल्याने सारे वंगबधू हळहळले होते. पण पाचव्या दिवशी लॉईड बाद झाल्यानंतर सीन पालटला. कालीदा बाद व्हावा म्हणून मनोमन प्रार्थना सुरू झाल्या अन् प्रार्थनेचं फळ मिळालं. १०–३५ ला चंद्राच्या एका उसळत्या चेंडूवर विश्वनाथने त्याला टिपले (१७८/५). मग द्वितीय सोबर्स बनार्ड ज्यूलियन बाद होण्यासाठी सर्वजण हायहाय करू लागले व १०–५० ला ज्यूलियनलाही चंद्रानेच पायचित केले. (१८६६).

आता फिकिर नव्हती. ज्यांनी मारे लच पॅकेट विकत घेतले होते तेच खेळ उपहारानतरही चालावा म्हणून कुरकुर करीत होते. तसे झाले नाही. उपहाराच्या ५ मिनिटपूर्वी खेळ आटोपला व भारत विजयी झाला.

आता डोळे व कान मद्रासकडे—— ☐

# आंदोलनातून जागरूक जनतागट निर्माण व्हावेत

**जयप्रकाश नारायण**

बिहारचे आंदोलन सुरू झाल्यापासून इंदिराजी, त्यांचा पक्ष आणि त्यांची सरकारे जाणून-बुजून असत्य प्रचार करीत आहेत. मी एकेका गोष्टीचा अनेकदा इन्कार करावा आणि त्यांनी पुन्हा तीच गोष्ट माझ्या गळी बांधावी असे चालले आहे. उदाहरणार्थ, पक्षातीत सरकारची स्थापना. बिहारमध्ये पक्षविरहित सरकार स्थापण्याचा माझा कधीच उद्देश नव्हता व आजही नाही. आता हे खरे की, पक्षविरहित शासन हे जेवढे मार्क्सवादामध्ये बसते तेवढेच ते सर्वोदयवादामध्येही बसते. पण तो फार फार दूरचा पल्ला आहे. त्याकरिता प्रथम देशातला समाज वर्गविरहित हवा, येथला समाज त्या धर्तीचा नाही तेव्हा येथे पक्षविरहित शासनाचा प्रश्न उत्पन्नच होत नाही.

बिहारमधल्या आंदोलनाचा पक्षविरहित सत्ता स्थापनेशी अर्थाअर्थी कसलाच संबंध नाही. जेव्हा केव्हा बिहारमधील मंत्रिमंडळ कोसळेल; येथली विधानसभा बरखास्त होऊन येथे राष्ट्रपतींची राजवट जारी होईल तेव्हा नियमानुसार आम्ही नव्या मध्य निवडणुकांचा आग्रह धरू. त्या निवडणुकीत सध्याचे सगळे पक्ष अर्थातच सहभागी होतील.

पंतप्रधानांना मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की त्यांनी खुशाल संथ गतीने चालावे. मला किंवा माझ्या पाठीराख्यांना आमचे इच्छित साधण्याची जरासुद्धा घाई झालेली नाही. बिहारचे सरकार बदलण्यामध्ये खरे हित पंतप्रधानांचेच आहे. काही झाले तरी खुल्या निवडणुकांमध्ये कॉंग्रेस पक्षाचा पराभव अटळ आहे. आमचा प्रयत्न निवडणुका तशा खुल्या वातावरणात घडाव्यात एवढाच असणार आहे. सरकार पक्षाचे प्रवक्ते माझी ही उद्दिष्टे लोकांपुढे कधीच मांडीत नाहीत. कारण माझ्या या उद्दिष्टांचेच त्यांना भय वाटते. शस्त्रक्रिया करवून घेण्यासाठी वेलोरला जाण्यापूर्वीपासून मी एवढेच सांगत आलो की या आंदोलनामधून जागरूक जनता गट निर्माण व्हावेत. उमेदवारांच्या निवडीमध्ये त्या गटांचे प्राबल्य प्रस्थापित व्हावे एवढेच मला साधावयाचे आहे. हेच गट नंतर निवडून येणाऱ्या आमदारांवर वचक ठेवू शकतील.

आज अशा आमदारांवर नियंत्रण ठेवण्याची कोणतीच यंत्रणा उपलब्ध नाही. राजकीय पक्ष त्यांच्या सध्याच्या विशिष्ट बांधणीमुळे आमदारांवर असे वजन ठेवू शकत नाहीत. प्रगत देशात जनतेच्या प्रतिनिधींवर असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवणारी सुविध जनता असते. आम्हाला येथे ती निर्माण करायची आहे. येथे जागृत लोकमत नाही. जे थोडेफार आहे त्याची दखल घेतली जात नाही येथे तुल्यबळ पक्षसंघटना नाहीत, स्वतंत्र, सुबुद्ध घटनातज्ज्ञांचे प्रभावी अस्तित्व नाही त्याचप्रमाणे सामाजिक घटनांवर प्रभाव पाडू शकेल अशी समर्थ वृत्तसृष्टीही नाही. स्वाभाविकपणेच येथल्या लोकशाहीमध्ये लोकशाही तत्त्वाचाच खासा अभाव आहे.

मला लोकनियुक्तांवर लोकांचे नियंत्रण प्रस्थापित करावयाचे आहे. प्रगत देशामधील सुबुद्ध लोकशाही नीती मी येथे उद्याच्या उद्या आणून उभी करू शकणार नाही. पण बिहारमधल्या आंदोलनाच्या निमित्ताने निवडून येणारांवर नियंत्रण ठेवणारी लोकयंत्रणा निश्चितच जन्मास येत आहे. ही यंत्रणा उचित उमेदवारांची निवड करील. त्याचप्रमाणे तो निवडून गेल्यानंतर त्याचे सूत्रचालनही करील. मतदारांच्या हाती असणारा हा आसूड मला नितांत महत्त्वाचा वाटतो ! ही घटना लोकशाहीवाद्यांना आनंददायक वाटावी अशीच आहे. परंतु कॉंग्रेसचे नवे अध्यक्ष म्हणतात की जयप्रकाशजींचा मुळी लोकशाहीवरच विश्वास नाही. माझ्या मते पार्लमेंटरी लोकशाहीमध्ये अनंत दोष आहेत पण त्या पद्धतीला निर्दोष पर्याय गवसेपर्यंत मलाही तीच पद्धती प्रिय आहे. सर्वोदयवादी या नात्याने मी गावोगावची आणि शहरांचीही स्वतंत्र शासने कल्पितो. पण तसा आदर्श समाजरचनेचा आढळ झाल्यानंतर त्यापूर्वी नव्हे. तशी कोणतीच शासनयंत्रणा कधीच परिपूर्ण नसते. आपण परिपूर्णतेकडचा तो प्रवास निश्चयपूर्वक जारी ठेवायचा असतो. पंतप्रधान पुन्हा पुन्हा सांगतात की, बिहारमधले आंदोलन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि आनंदमार्गी यांच्या आहारी गेले आहे. त्या असेही सांगतात की, पक्षाचे कडबोळे हे आंदोलन चालवीत आहे त्यांचे असेही म्हणणे आहे की हा पूर्वीचा सगळा खटाटोप केवळ त्यांना खुर्चीवरून खाली ओढण्याकरिता आहे.

विद्यार्थी परिषद आणि जनसंघ यांचा या आंदोलनाशी जरूर घनिष्ट संबंध आहे. पण येथे आनंदमार्गी कोठे आहेत ते मला तरी दिसत नाहीत. पंतप्रधानांना ते कसे दिसतात कोण जाणे. पण येथे फक्त संघ, जनसंघ आणि विद्यार्थी परिषद येवढेच घटक नाहीत. यांच्या व्यतिरिक्त समाजवादी आहेत, संघटना कॉंग्रेस आहे, मार्क्सिस्टसुद्धा आहेत. सी. पी. ए. एम. चे आंदोलनाला सहाय्य आहे. फॉरवर्ड ब्लॉक सुद्धा येथे सहभागी आहे. इंदिराजी मात्र जे येथे नाहीत त्यांचा उल्लेख करतात. जे आहेत त्यांचे नाव कटाक्षाने टाळतात.

ग्रँड अलायन्स म्हटल्याने काय होते ? इंदिराजींना एवढे समजावयास हवे की लोकशाही म्हटली की विरोधी पक्षांना सत्ताधारी पक्षाला खुर्चीवरून खाली ओढण्याचा हक्क रीतसरच प्राप्त झालेला असतो. त्यात दूषण देण्यासारखे काय आहे ? आपला पक्ष पराभूत होण्याचे किंवा आपल्याला खुर्ची गमवावी लागण्याचे इंदिराजींना एवढे भय का वाटावे हे समजत नाही असे काही घडावे हे लोकशाहीमध्ये अपरिहार्यच आहे. त्यांचे सतत खुर्चीवर राहणे याला लोकशाही कसे म्हणता येईल ?

काही तुरळक टीकाकार म्हणतात की या आंदोलनाच्या पाठीशी परकीय सत्ता आहे. जर त्यांना केवळ राळ उडवीत राहावयाचे नसेल तर त्यांनी प्रकटपणे पुरावा का सादर करू नये ?

जोपर्यंत असा कोणताच पुरावा पुढे आणला जात नाही तोपर्यंत असेच म्हणायला हवे की इतर अनेक प्रचाराप्रमाणे हाही एक निव्वळ खोटा, जाणूनबुजून चालविलेला निंद्य प्रकार आहे. या निंदकांच्या मनामध्ये लोकशाही विषयीचे कसलेही प्रेम तर नाहीच, काही असेल तर माझ्याविषयी आणि बिहारमधल्या पीडित जनतेविषयी अकारण विद्वेष आहे.

(‘संवाद’ वरून)

प्रसिद्ध उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचा एक लेख श्रीमती चंद्रा किर्लोस्कर यांच्या वाचनात आला. त्यानिमित्त त्यांनी एक वेगळी समाजरचना कशी असू शकेल याविषयीचे आपले चिंतन इथे सादर केले आहे.

# आर्थिक कोंडी : भांडवली विचारसरणीचा पुनर्विचार

**चंद्रा किर्लोस्कर**

प्रसिद्ध उद्योगपती श्री. शतनूराव किर्लोस्कर यानी किर्लोस्कर मासिकाच्या ऑगस्ट १९७४ च्या अकामध्ये 'आजच्या आर्थिक कोंडीवर उपाय काय' या शीर्षकाचा एक लेख लिहून देशाच्या सध्याच्या आर्थिक दुरवस्थेचे चित्र रेखाटले आहे आणि त्यावर काही उपायही सुचवले आहेत. त्यानी वस्तुस्थितीची प्रतिमा उभी केली आहे.

परतु आजच्या परिस्थितीची कारण परंपरा त्यानी दाखवली आहे, ती अपुरी आणि अर्धवट वाटते. त्यामुळे त्यानी त्यावर सुचवलेले उपाय अपुरे तर आहेतच, परतु ते प्रतिगामीही बरेचसे आहेत, असे म्हटल्याशिवाय गत्यतर नाही. त्यानी सुचवलेले उपाय सर्वस्वी शासनासाठी आहेत. आणि शासनाने ते उपाय अमलात आणण्याचा विचार करायचे कदाचित् योजलेच तर देशाच्या प्रगतीचे तोंड विसाव्या शतकातून अगदी सुरुवातीच्या काळाकडे त्याला वळवावे लागेल.

आजच्या सरकारी यत्रणेवर देशाच्या उत्पादनाचा बहुताश खर्च होतो हे त्याचे म्हणणे शभर टक्के खरे आहे. पण सरकारी खर्च कमी करण्याचे एकेक मार्ग सुचवीत शेवटी लोक प्रतिनिधित्वाकडून एकसूत्री कारभाराच्या दिशेने सरकारने पावले टाकावीत असे त्यानी सुचवले आहे. ही त्याची सूचना देशाला हुकूमशाहीकडे नेणारी नाही? लोक प्रतिनिधित्वाकडून एकसूत्री कारभाराकडे वळून पहाणे म्हणजे पुन: भूतकाळाकडे वळणे नव्हे? जर्मनीमध्ये हिटलरच्या उदयापूर्वी तेथील भांडवलदाराचे चिंतन याच स्वरूपाचे होते असे इतिहास सागतो.

आजही अनेक देशात एकसूत्री कारभाराचे प्रयोग चालू आहेत. परतु त्यातून देशाचे उत्पादन वाढले आणि ते सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचले असे कुठे दिसत नाही. आणि काही ठिकाणी कदाचित् अपवाद म्हणून या दोन्ही गोष्टी होत असतील तरीही एकसूत्री कारभार असलेल्या बहुसख्य देशातील सूत्रधार आणि त्याचे पाठीराखे, मदतनीस याच्या तालावरच त्या त्या देशातील अशिक्षित आणि शिक्षित, मजूर आणि भाडवलदार, रक आणि राव यांना नाचावे लागते. नाइलाजाचे आणि नामुश्कीचे जीवन लाचारीने जगावे लागते. सूत्रधाराच्या लहरीनुसार देश अनेकदा विनाशाच्या गर्तेतही जाऊन पडतो.

सरकारी क्षेत्रातील (आजच्या पब्लिक सेक्टरला सरकारी सेक्टर–क्षेत्र म्हणणेच योग्य होईल.) उद्योगाची त्यांनी वर्णन केलेली स्थिती चुकीची मुळीच नाही. परतु खासगी क्षेत्रातील उद्योगाची आज जी पिछेहाट होत आहे, उत्पादन घटते आहे, ते काय त्याच्यावर सरकारची भरमसाट बंधने आहेत म्हणून? या उद्योगाचे जे आज स्वरूप आहे, तिथे जे तणाव आज आहेत तेही उत्पादन घटायला कारणीभूत नाहीत, असे श्री शतनुरावजी म्हणू शकतात? जोवर उद्योगधद्यामध्ये उद्योग उभारणीमधला केवळ एक भाग असलेल्या भांडवलाचा वरचष्माच केवळ नव्हे, भाडवलचसर्वेसर्वा, कर्तुमकर्तुम् अशी स्थिती राहील तोवर उद्योग सरकारी क्षेत्रांतील असोत की खासगी क्षेत्रातील असोत, त्याची स्थिती फारशी भिन्न आहे असा दावा करण्याचे कारण नाही. मात्रा कमी–जास्त असेल एवढेच. उद्योगाच्या क्षेत्रामध्ये मालक आणि मजूर, श्रम विकत घेणारे आणि श्रम विकणारे असे नाते राहील तोवर उत्पादनाचे प्रमाण वाढणे अगदी अशक्य. लाभाची, अधिक लाभाची आणि त्यासाठीच्या स्पर्धेची प्रेरणा यानतर उत्पादनवाढीच्या कामामध्ये उपयोगी ठरणार नाही. उत्पादनवाढीचे इगित आता अन्यत्र शोधावे लागेल. उद्योगामध्ये शेतीचे उत्पादन आलेच. कमाल जमीन धारणेचे सीलिंगचे प्रमाण वाढवले, जमिनीचे तुकडे मोठे केले तरी उत्पादन वाढेल आणि ते देशाची गरिबी आणि उपासमार अस्ताला नेईल याची काही खात्री आहे? मोठे शेतकरी आजही हजारो आहेत. त्याच्या जमिनीतील उत्पादन देशाची समृद्धी वाढवणारे, उपासमारी थाबवणारे दिसते? त्याच्या उत्पादनातून त्यांची समृद्धी वाढली, अनेक अगानी वाढली. परतु परिसरातील जनतेला काही मिळाले तर आणि तेही फक्त थोड्याना केवळ जीव जगवण्यापुरता एकाद्या वेळचे अन्न आणि लाज झाकण्यापुरता एकादा कपडा? आपल्या उत्पादनातून देशाचे दैन्य-दारिद्र्य दुर्भिक्षही जावे अशी चिंता त्यानाही नाही आणि कारखानदारानाही नाही.

इथल्या धनिकाना, कारखानदाराना आणि श्रीमत शेतकऱ्याना उत्पादनासाठी ज्या सोयी–सवलती आजवर मिळाल्या त्याचा त्यानी देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपयोग केला असे म्हणता येणार नाही, हे स्पष्टच आहे. आणि याच मडळीवरची सरकारी बधने कमीत कमी व्हावीत, सवलती अधिक द्याव्यात, देशाच्या उत्पादनाचा वाटाही यांच्याकडील उत्पादन अधिक साधनात जावा असे श्री. शतनुरावजीचे म्हणणे? पण आजच्या शासनयत्रणेवर

यांचाच कब्जा आहे ना ! शासनाचे सुकाणू यांच्याच हातात ! नियोजनाच्या नाड्याही यांच्याच हातांत ! त्यामुळे आजचे शासन आणि नियोजन हे या सर्वांच्या हितसंबंधाचे संरक्षण आणि समृद्धी यांचा विचार डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करते यात काय नवल ?

त्यांची तिसरी सूचना आहे. आज शासनाने हाती घेतलेल्या समाज कल्याणाच्या योजना देशाची आर्थिक अवस्था लक्षात न घेता हाती घेतल्या आहेत. त्या त्वरित बंद कराव्या. त्यांची हीही सूचना भयंकर वाटते. आजचे शासन आणि नियोजन, त्यातील मंडळींच्या मोठेपणासाठी आणि स्वार्थासाठी का होईना देशाच्या उत्पन्नाच्या काही वाटा लोककल्याणाकडे खर्च करण्याची योजना तरी आखते. या देशाच्या प्रत्येक नागरिकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षणाचा हक्क त्यांनी नाकारला तरी नाही. तो पुरा करण्याची असमर्थता त्यांनी व्यक्त केली आणि समाज कल्याण योजनांच्या रूपाने अंशतः काही करण्याचा प्रयत्न तरी त्यांनी चालविला आहे. परंतु शंतनुरावजींनी तर देशाच्या आर्थिक स्थितीकडे बोट दाखवून या देशाच्या मागास आणि दारिद्र्यामध्ये खितपत पडलेल्या वर्गाला हीही मदत देणे म्हणजे दिवाळखोरी आहे असे मत व्यक्त केल्यासारखे वाटते.

आर्थिक परिस्थिती पाहूनच देशाची खर्चाची योजना आखायची हे बरोबर. पण ती कोणत्या तत्त्वावर ? देशाची जी काही आर्थिक क्षमता असेल तीत अग्रक्रम प्रत्येक नागरिकाच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्याला दिला पाहिजे की नाही ? शासनाच्या आणि नियोजनांच्या उग्र पदस्थांच्या आणि उद्योगपतींच्या करुणेवर, समाज कल्याणाच्या त्यांच्या योजनांवर बहुसंख्यांना जगावे लागावे हे लोकतंत्राने चालणाऱ्या देशामध्ये चूकच आहे. त्यांना करुणा नको हे तर खरेच. तो त्याचा हक्क आहे. पण करुणाही नाकारून चालायचे नाही. करुणेच्या जागी जीवनाची समान संधीच यायला हवी. तशी व्यवस्था येईपर्यंत केलेल्या योजना या वर्गांना समर्थ बनवण्यासाठी केलेला एक अत्यल्प प्रयत्न म्हणता येईल. तोही आपण नाकारणार आहात ?

अर्थात शासनाच्या आजच्या योजना आणि त्यासाठी खर्च होणारी रक्कम शासनाच्या फाफट पसाऱ्यामध्ये आणि त्याच्या अर्थ योजनेला लागलेल्या गळतीमध्ये नाहीशी होऊन जाते हे खरे आहे. पण त्याला उपाय त्या योजना बंद करणे हा नव्हे. फाफट पसारा आकुंचित होत जाईल, अर्थयोजनेची सर्व छिद्रे बुजतील असे प्रयत्न करावे लागतील, हे खरेच आहे—पण त्यांची दिशा कोणती ? यावर आर्थिक कोंडी फुटणे अवलंबून राहील ना ? भय आणि प्रलोभन ही दोन्ही आर्थिक कोंडी फुटण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पादनवाढीच्या कामी येणार नाहीत. मग दुसरा पर्याय कोणता ?

या प्रयत्नांसाठी बहुसूत्री कारभाराकडून एक सूत्री कारभाराकडे वळण्याऐवजी बहुसूत्री कारभाराचे पुढचेपाऊल जे सर्वसूत्री कारभाराचे त्याकडे आता वळावे लागेल. विसाव्या शतकाचा हा अंतिम चरण आपल्याला त्यासाठी आवाहन करीत आहे.

उद्योगाच्या क्षेत्रात आज थोडेसेच मेंदू काम करतात. बाकी हजारो, लाखो हातच कामामध्ये असतात. हा कारखाना—उद्योग माझा आहे अशी भावना नसते. त्या हातांचे मालक आलेले असतात केवळ श्रम विकण्यासाठी. कमीत कमी श्रमात जातीत जास्त मोबदला मिळवण्याची भावना असते. या हातांसोबत हृदयही येईल, मेंदूही येईल अशी योजना करावी लागेल. उद्योगाच्या सूत्र संचालनात त्यातल्या नफा—नुकसानीत आणि त्याच्या मालकीत मीही एक भागीदार आहे ही भावना या हातांसोबत काम करू लागेल तेव्हा उद्योगाच्या क्षेत्रात एक नवे पर्व उदयाला येईल, उत्पादन अगदी अल्पावधीत उच्चांक गाठील. हा उद्योग माझा आहे, त्याच्या उत्पादनाच्या उच्चांकामध्ये आणि उत्कृष्टतेमध्ये माझीही उन्नती आहे आणि देशाचीही आहे ही भावना त्याच्याशी संबंधित असलेल्या प्रत्येकाची असावी लागेल—उद्योगांच्या संचालनामध्ये, नफा नुकसानीत, त्याच्या मालकीत त्यात काम करणारा प्रत्येकजण वाटेकरी झाला तरच ही अवस्था येऊ शकेल. यामध्ये पुढाकार उद्योगपतींना आणि संचालकांना घ्यावा लागेल. कामगार संघटनांच्या प्रमुखांना घ्यावा लागेल.

सर्व सूत्री कारभाराचे लोण शेतीमध्येही यावे लागेल. गावाच्या जमिनीचे तुकडे नकोत हे खरे. मुळीच करू नयेत तुकडे. विभागणी होईल ती शेतीच्या मशागतीच्या, मेहनतीच्या दृष्टिकोनातून. शेतीचे नियोजन संबंध गावाकडे, सर्व ग्रामस्थांच्या मिळून बनलेल्या मंडळाकडे रहावे, तिच्यात घाम गळेल गावातल्या सर्वांचा. मेंदू आणि मनही मनगटासोबत शेतामध्ये उतरेल. आज ही दोन्ही शेताच्या बांधावरच फार तर उभी राहातात. बहुत करून शहरातच त्यांचा रहिवास. मेंदू-मन-मनगट त्रिमूर्ती इथेही कामाला लागावी लागतील. गावातल्या प्रत्येकास पुरून उरेल इतके उत्पादन करायचेच असा संकल्प सबंध गावचा झाला तरच हे शक्य आहे. त्यासाठी गावातल्या सबंध जमिनीचा मीही एक मालक आहे आणि गावातले सर्वच श्रमामध्येही भागीदार आहेत तिथे उच्च नीचतेची भावना नाही अशी खात्री निर्माण व्हावी लागेल.

शासनाच्याही क्षेत्रात सर्व सूत्री अवस्था आली तर वरच्या डोलाऱ्याचा फाफट पसारा आपोआप एकदम कमी होऊन जाईल. मग

बॉंबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मॅनिला पीस
फक्त रु. १०।-
जीन शर्ट पीस
फक्त रु. १०-४५
सुपर ऑफर

५०-५०, ६०-६० मंत्र्याचा लवाजमा प्रदेशाच्या अथवा केंद्राच्याही ठिकाणी राहण्याची शक्यताच उरणार नाही- गावाच्या पातळीवरचे शासन-नियोजन आपापला शेती-उद्योग करून फावल्या वेळात महिना पधरा दिवसांनी गावातील सर्व ग्रामस्थ एकमताने निर्णय घेऊन करतील. या व्हिलेज पार्लमेंटमध्ये गावामधील सर्व प्रौढ स्त्री पुरुष भाग घेतील. गावातील प्रत्येकाला काम मिळाले पाहिजे आणि त्यातून त्याच्या अन्न-वस्त्र निवाऱ्याची, शिक्षणाची व्यवस्था झालीच पाहिजे. असे नियोजन गावकरी करतील आणि अशा रीतीने गावच्या पातळीवर शासन आणि नियोजन याच्यासाठी यत्रणेवर खर्च आला तरी तो अगदी नाममात्र होईल. अंमल बजावणी करणारी समिती हे व्हिलेज पार्लमेंट, इलेक्शन ऐवजी एकमताने सिलेक्शन करून नेमील. उत्पादन, सरक्षण, न्याय-शिक्षण आदि सर्व विभागामध्ये त्या त्या विभागाला योग्य आणि हृदय ओतून काम करणारी निःस्वार्थी मडळी -गावात सर्वजण एकमेकांशी परिचित असल्याने आणि एकमताच्या शर्तीमुळे निवडली जातील. योगक्षेमाची व्यवस्था व्हिलेजपार्लमेंट करील. गावाच्या पातळीवर लोकशक्तीचा हा मन-मेंदू-मनगटाचा त्रिवेणी-सगम झाला की पुढे काम रहाते सहकाराचे. जगाच्या सदर्भात एक राष्ट्र म्हणून येणाऱ्या समस्या पहाण्याचे. गावच्या पुढच्या वरच्या तहसील पातळीसाठी व्हिलेज पार्लमेंटने सिलेक्ट केलेले प्रतिनिधी तहसील समिती बनवतील. त्याचक्रमाने जिल्हा प्रदेश आणि केंद्र समिती योग्यतेच्या निकषावर निवडली जाईल. नि.स्वार्थी, जीव ओतून प्रयत्नाची पराकाष्ठा करणारे समाजातले अव्वल दर्जाची सत्वसपन्न माणसे क्रमाने वरच्या पातळ्याचे काम करण्यासाठी जातील. सर्वत्र नियम सर्वसमतीचा राहील. इन्सेटिव्ह राहील ते निरपेक्षपणे काम करण्याचे, सबध देशाला समर्थ-समृद्ध करण्याचे. मला काय मिळेल याचे नाही.

आज मला काय फायदा मिळेल हा विचार समाजात आहे. फायद्याची प्रेरणा-तिच्या आधारावर समाजाची आणि समाजातल्या सर्व अगोपागाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही प्रेरणा एकसूत्री कारभाराने कशी नियत्रणात राहील ? जो जो नियत्रणे वाढतील तो तो पळवाटा वाढतीलच. सबध समाजच जेव्हा पळवाटा शोधू लागतो तेव्हा नियत्रणे ठेवणारे कुठवर ठेवतील ? अणि नियत्रण ठेवणारानांही फायद्याची प्रेरणा नसावी असे कसे होऊ शकेल ? तेव्हा इथे आज कुपणच शेत खात आहे असे नव्हे कुपणाला चुकवण्याच्या नादात शेतही स्वत:ला खात आहे. कुपण--मग ते अनेकाचे असो की एकाचे, कुपण-विरुद्ध शेत असा झगडा सुरू झालेला आहे. आर्थिक कोंडीचे मूळ मला वाटते, या सर्व गोष्टीत आहे. म्हणून कुपण आणि शेत यातला भेद सपायला हवा. शेतच आपली राखण करू लागेल; तेव्हा हे अरिष्ट सपेल ! ('सर्वोदय साधना' अकावरून पुनर्मुद्रित.)

□ □

---


पिंगे याच्याबावत प्रथम लक्षात येते ती त्यांची अत्यंत पृथगात्म व्यक्तिमत्त्वसपन्न अशी भाषाशैली. आजच्या मराठी साहित्यात व पत्रव्यवसायात शैलीकार तसे मोजकेच आहेत. पु ल. देशपांडे, दुर्गा भागवत, कृ. द. दीक्षित अगर अप्पा पेंडसे ही सहज आठवणारी काही नावे. याच्यापैकी व्यक्तिचित्रण बहुतेकानी समर्थपणे हाताळले आहे पिंग्याची मराठी पोसलेली तर आहेच, परतु तिला स्वत.चे असे एक फाकडे वळण आहे. त्याच्या हातची कोणतीही चार वाक्ये सलग वाचा; हे वळण जाणवलेच पाहिजे ! खेरीज कोणत्याही चागल्या शैलीकाराच्या अगी असणारे गुण : शब्दाच्या सूक्ष्म अर्थच्छटाची जाण, चित्रमयी शब्दयोजना, वाक्यरचनेची आगळी लपेट इ.

—ज्ञानेश्वर नाडकर्णी
रविवार, महाराष्ट्र टाइम्स

# शतपावली

रवींद्र पिंगे

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन


---

# बांगला देश

## आणीबाणीची पार्श्वभूमी

वा. दा. रानडे

आर्थिक पेचप्रसंग आणि वाढता दहशतवाद यांना तोंड देण्यासाठी बांगला देशामध्ये आणीबाणीची परिस्थिती जाहीर करणे आणि मूलभूत हक्क स्थगित करणे पंतप्रधान शेख मुजीबुर रहमान यांना भाग पडले. बांगला देशाच्या स्थापनेला गेल्या महिन्यात तीन वर्षे पुरी झाली पण त्या देशास अजूनही स्थैर्य लाभलेले नाही. पाकिस्तानने बांगला देशाला मान्यता दिली असली तरी दोन्ही देशांचे संबंध सुधारण्याच्या दृष्टीने काहीही प्रगती झालेली नाही.

बांगला देशाचे आर्थिक दुखणे फार जुने आहे. पाकिस्तानच्या स्थापनेपासून या प्रदेशाला पाक राज्यकर्त्यांनी वसाहतीसारखे वागविले. त्याला मागासलेला ठेवला. तागाच्या निर्यातीपासून भरपूर परकीय चलन पाकला मिळाले पण त्याचा उपयोग त्या प्रदेशाच्या विकासासाठी न करता पश्चिम पाकच्याच विकासासाठी करण्यात आला. भाषा, शिक्षण, उद्योगधंदे, व्यापार सर्वच बाबतीत झालेल्या या पद्धतशीर पिळणुकीविरुद्ध झगडण्यासाठी बांगला देशाची जनता शेखमुजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखाली संघटित झाली आणि पाक लष्करी हुकूमशाहीशी धैर्याने झुंज देऊन भारताच्या मदतीने डिसेंबर १९७१ मध्ये बांगला देशाचे स्वतंत्र राष्ट्र स्थापन झाले. पण बांगला देश स्वतंत्र झाला तरी तो दुबळा रहावा, तेथे पाक हस्तकांच्या फूटपाड्या कारवाया चालू ठेवाव्यात आणि योग्य संधि साधून त्या प्रदेशावर आपले वर्चस्व पुनः प्रस्थापित करावे या उद्देशाने पाकच्या राज्यकर्त्यांची पावले पडत होती. यासाठीच बांगला देशाशी संबंध न सुधारता सतत अडवणुकीचे धोरण भुट्टोंनी चालू ठेवले व याबाबतीत लष्करी अधिकाऱ्यांचे दडपण भुट्टोंवर होते. दोन्ही देशातील आर्थिक देण्याघेण्याची बोलणी लौकर सुरू करून हे प्रश्न निकालात काढावेत असे मुजीबना वाटत होते पण भुट्टोंना कोणतीही घाई नव्हती. उलट निरनिराळ्या सबबी पुढे करून, आडमुठेपणाचे धोरण स्वीकारून हे प्रश्न लौकर निकालात काढण्याचे त्यांनी नाकारले. बांगला देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्याच्या विकासासाठी खर्च पाकच्या राज्यकर्त्यांना करायला हवा होता तो केला नाही. त्याचा रास्त वाटा आम्हाला मिळाला पाहिजे अशी मुजीब यांची मागणी आहे. भुट्टोंना ती मान्य नाही. अशा परिस्थितीत हे प्रश्न लौकर सुटण्याची शक्यता दिसत नाही. दुष्काळ, वादळे, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींनी बांगला देशाची आर्थिक स्थिती अधिकच बिकट झालेली आहे.

हे सर्व खरे असले तरी ही कारणे पुढे करून बांगला देशाच्या अधिकाऱ्यांना आपल्या अकार्यक्षमतेचे समर्थन करता येणार नाही. तांदूळ खरेदीच्या मोहिमेत सरकार फारशी प्रगती करू शकले नाही आणि व्यापारी आणि मोठे शेतकरी यांच्या साठेबाजीला आळा घालण्यात त्याला यश आलेले नाही. लोकांच्या गरजेच्या मानाने सरकारजवळचा उपलब्ध धान्य पुरवठा पंचवीस टक्के कमी आहे. देशाला ८५ टक्के परकीय चलन मिळवून देणाऱ्या तागाच्या निर्यातीत घट झाली आहे. ताग गिरण्यांना गेल्या तीन वर्षांत तीनशे कोटी रुपये तोटा आला. बँकांनी कर्ज द्यायचे नाकारल्याने यापैकी बहुतेक गिरण्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. कच्चा माल आणि सुट्या भागांच्या अभावी इतर कारखान्यांचीही तीच परिस्थिती आहे. चोरट्या व्यापाराने बराच पैसा परदेशी जात आहे. सरकार त्याला आळा घालू शकलेले नाही.

सरकारला दुसरा मोठा धोका दहशतवादी गटांच्या हालचालींचा आहे. हे गट मुख्यतः पाकचे आणि चीनचे हस्तक आहेत. गेल्या जूनमध्ये डाक्का विमानतळावर पाक पंतप्रधान भुट्टोंचे ज्या उत्साहाने स्वागत झाले त्यावरून बांगला देशामध्ये पाकधार्जिणे गट आहेत याबद्दल आता कोणाला शंका राहिलेली नाही. वाढत्या आर्थिक असंतोषाचा फायदा घेऊन ते आपले बळ वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. अवामी लीगच्या तीन नेत्यांचा ते ईदची प्रार्थना करीत असता भर दिवसा खून करण्यात आला. आतापर्यंत असे दहशती हल्ले रात्री होत असत पण ते आता दिवसाही होऊ लागले आहेत. गेल्या तीन वर्षात अवामी लीगच्या तीन हजार कार्यकर्त्यांचे खून झाल्याचे शेख मुजीब यांनी सांगितले. युद्धाच्या काळापासून लोकांकडे असलेले शस्त्रसाठे जप्त करण्यात सरकारला यश आले नाही त्याचा हा परिणाम आहे.

सोळा डिसेंबरला बांगला स्वातंत्र्यदिनी माओवाद्यांनी अनेक ठिकाणी स्फोट घडवून आणले. सिराज सिकदार यांचा गट माओवादी आहे. पूर्व बांगला सर्वहारा पक्ष असे नाव त्यांनी आपल्या पक्षाला दिले आहे. चितगाव भागात त्याचा जोर असून डाक्का बारिसाल, खुलना येथेही केंद्रे आहेत. चकमा टोळीवाल्यांशी त्यांचे संधान आहे. या टोळीवाल्यांनी एक भूमिगत सेना उभारली आहे. मिझोंकडून त्यांना शिक्षण मिळते व त्याच्या बद्दल मिझोंना आपल्या प्रदेशातून ब्रह्मदेशमार्गे चीनकडे जाण्यास ते मोकळीक देतात.

अवामी लीगची एकजूट टिकवून तो अधिक शिस्तबद्ध व कार्यक्षम पक्ष कसा करावयाचा हा मुजीब यांच्यापुढे मुख्य प्रश्न आहे. काँग्रेस प्रमाणेच अवामी लीगमध्ये

पृष्ठ २४ वर




नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
काजळ, नेत्रांजन, बाळगोळी
उत्पादक
काकडे अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०

# सोलकढी

## □ तीन दिवसांचा कापूर

इचलकरजी, इगतपुरी, इस्लामपूर, इटारसी अशा 'इ'काराने सुरू होणाऱ्या गावाबद्दल माझ्या ऐसपैस मनाला कसलेतरी गूढ, *अनामिक, खुळेबावळे आकर्षण वाटत आलेले* आहे. माझे असे अनेक खुबीदार ठोकताळे आहेत: 'सॉरी हूऽ' किंवा 'थॅंक्यू हूऽ' म्हणणाऱ्या व्यक्तीची टिंगल करायचा मोह मला होतो. कोणाच्या घरी प्रथमच गेलो असता, गुठळ्या झालेला गोडाचा शिरा मला खावा लागला तर त्या घराबद्दल आणि घरवताबद्दल माझे मत फटफेगड होते. केसाचा मधोमध भाग पाडणारे वापू नाडकर्णी, एम्. करुणानिधी याच्यासारखे पुरुष मला आवडत नाहीत, उलट एका बाजूला भाग पाडणाऱ्या बायकामुली मला आवडतात. सागायचा मुद्दा एवढाच की इचलकरजी गावाबद्दल मनात ओढ होती. त्यात तिकडे अखिल भारतीय मराठी साहित्य समेलन भरणार होते. मराठी साहित्य समेलनाइतकी करमणूक करणाऱ्या फारच थोड्या गोष्टी या महाराष्ट्रात आहेत, हे *मला अनुभवाने माहित झाले होते. त्यात* पु. ल. देशपांड्यासारख्या खसखसपिकव्या खासेरावाने, अनेकवार नकार देऊन, आता अध्यक्ष व्हायचे कबुल केले होते. म्हणजे चहा, चिवडा, चिरूट अशी चगळ होती.

माझ्याप्रमाणेच एक साहित्यप्रेमी म्हणून परराष्ट्रमंत्री यशवतराव चव्हाण साहित्यसमेलनाला आले होते ते येणार अशी आधीच वाजतीगाजती प्रसिद्धी झाली होती. मला प्रसिद्धी आवडत नाही. मी तसाच गेलो. पूर्वसमेलनीय प्रथेनुसार यशवतरावानी या समेलनाचे उद्‌घाटन करायचे. परतु, समेलनाच्या त्या साहित्यिक व्यासपीठाला मत्र्याचे चामड्याचे पाय लागता कामा नयेत, अशी म्हणे पुरुषोत्तम लक्ष्मण देशपाड्यानी समेलन—सूत्रधाराना सज्जड ताकीद देऊन ठेवली होती. (व्वा! व्वा! या पु. ल. देशपांड्याच्या अस्मितेची वा हस्मितेची *काय ही कमाल*) त्यामुळे यशवंतराव माझ्यासारखेच आले; पु. ल. चे अध्यक्षीय भाषण ऐकताना पडजीभ दाखवत पुन्हा पुन्हा हसले; आपल्या रसिकतेची गुढी उभारून निघून गेले. यशवतराव हे राजकारणातले पु. ल. देशपाडे आहेत, आणि पु. ल. देशपाडे हे साहित्यातले यशवतराव आहेत, असे काहीतरी लोक म्हणत होते. मला ते काही समजले नाही. पण वाक्य खटकेबाज वाटले; म्हणून मीसुद्धा ते म्हणा*यला लागलो.*

बाकी पु. ल चे अध्यक्षीय भाषण हा एक *वेगळा एकपात्री प्रयोगच होता. आता मन*मुराद हसायचे असे ठरवून आठदहा हजार मडळी जमा झाली होती. पु ल. नी त्याची निराशा केली नाही. पावणेदोन ताम मडळी गडाबडा हसत होती. महाराष्ट्रातली एकवटलेली साहित्यिक रसिकता अशी गडाबडा हसताना पाहून काही गभीररावाच्या अंत-करणात गलबलत होते. माणसे अशी बेजबाबदारपणे कशी हसू शकतात? गभीरराव मनोमन व्याकुळ झाले होते. पु. ल. ना दाद न देता ते गभीरराव शून्यहास्य राहिले. त्याचे फळ त्यांना लगेच मिळाले. बाकिच्याची पोटे आणि जबडे हसूनहसून दुखू लागली. गभीररावाचे जबडे आणि पोटे न हसल्यामुळे दुखली. किती वेगळी होती ही दुखणी. समेलनात पु. ल. ची चारपाच लहानमोठी भाषणे झाली. प्रत्येक भाषणाच्या वेळी हा *अनुभव आला. भाषणांचे सोडा;* इतर साहित्यिक कार्यक्रमाच्या वेळीसुद्धा पु. ल. च रगमचावर झुलतझळकत होते. काही साहित्यिकांना हे फारसे श्लाघ्य वाटले नाही, असे इचलकरजीत पाहुणा आलेला पश्चिम महाराष्ट्रातला एक कावळा मला सागत होता.

समेलनातले बाकीचे कार्यक्रम वेळेवर पार पडले. अध्यक्ष म्हणून हाती असलेल्या अधिकाराचा आणि घड्याळाचा पु. ल. नी चागला उपयोग केला. व पु. काळे, वसत सवनीस, व्यकटेश माडगूळकर, गगाधर गाडगीळ आणि स्वत. पु ल. यानी आपापली एकेक कथा सागितली. व. पु काळ्यांची भाडक्या जोशाची कथा सर्वांना आवडली. गगाधर गाडगिळाच्या वडू—नानू—स्नेहलतेच्या कथेतल्या विनोदाने सर्वांना कासावीस केले. कविसमेलने दोन होती; कवी चिक्कार होते; लोकांची चिकाटी कौतुकास्पद होती. य चिकाटीमुळेच 'स्त्रिया आणि विनोद' आणि 'दलित साहित्य व सामाजिक जाणीवा' हे परिसवाद भरलेल्या मांडवात सपले. यातले एक सरोजिनी वैद्य यांचे भाषण तेवढे विचार-परिप्लुत का काय म्हणतात तसे झाले, असे सर्व वृत्तान्तात म्हटले आहे.

साहित्यसमेलनाच्या मडपात मी स्वत.ला हरवून बसत नाही. मी सावधपणे मडपाच्या काठावर स्वतःची हेळसाड करत राहतो. कारण मडपात मजा असली तर काठावर मज्जाचमजा असते. शिगाड आणि शेदाड असे दोन्ही प्रकारचे समेलनसोकाजी मधून-मधून सारखे काठाला लागतात. त्याच्याशी जे हळवे हितगुज होते ते खरे कोणी आपली ठणकणारी व्यथा हलकी करतात. कोणी आपला मोठेपणाचा फुगा कुरवाळत बसतात. कोणी नवी ओळख झाल्याच्या आनदात फसफसत राहतात. कोणी जुन्या ओळखी, खुणगाठी बाधून पक्क्या करतात. काठावर एकूण चौफेर पिवळेताबुसऊनकोवळे पसरलेले असते. इचलकरंजीला हे ऊन उतू चालले होते

ते निवासभोजन व्यवस्थेवरसुद्धा साडले होते! मी तर पहिल्या फटक्यात भोजन*व्यवस्थेवरच्या वजीर—प्याद्याना आपलेसे* करून टाकले. त्यामुळे आमची अगदी बाहेर*च्यासारखीच छान सोय लागली. आमच्या*सारखीच इतराचीही अवस्था झाली असावी. कारण साहित्यसमेलन असूनसुद्धा कुरबुर, घुसफुस, फणफण, आदळआपट, तणातणी, चिरचीर, पीरपीर, जळजळ, घळघळ कोठे पाहायला, ऐकायला मिळाली नाही. त्यामुळे फार चुकल्या चुकल्यासारखे झाले हे मात्र खरे. एकूणच समस्त इचलकरजियानी आमची भली बडदास्त ठेऊन आमचे कडबू करून टाकले.

अशा प्रकारच्या साहित्यसमेलनापासून फायदा काय होतो, असा एक वातड प्रश्न उपस्थित केला जातो. बाकिच्याचे मला ठाऊक नाही; पण माझ्यापुरते सागायचे तर समेलनाचे तीन दिवस कसे कापरासारखे उडाले. मागच्यापुढच्या फरफटणाऱ्या दिवसाच्यामधला चिमूटभर सुगध इचलकरजीच्या साहित्यसमेलनामुळे अनुभवायला मिळाला.

साहित्यसमेलनाला गेलो हे बरेच झाले.

—अनंतराव



# महाराष्ट्र सरस्वतीच्या दरबारात

भारत कुमार राऊत

इचलकरंजी महाराष्ट्राचं मँचेस्टर वगैरे. वर तिथं मराठी साहित्य संमेलन. तेसुद्धा सुवर्ण महोत्सवी. अध्यक्ष पु. ल. देशपांडे. तर अशी एकाहून एक जबरदस्त आकर्षणं. हे संमेलन गाजणार हे स्वाभाविकच होतं. आणि तसंच ते गाजलं. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातले छोटे–मोठे साहित्यिक आले. तीन दिवस न भांडता एकत्र नांदले. मोठ्या मोठ्या गोष्टी केल्या. पु. ल. ची दर अर्ध्या तासाच्या अंतराने होणारी खोखो भाषणं ऐकली. पोटभर मिट्ठास जेवले. आणि मिळेल ती एस्. टी. पकडून घरी गेले.

तर सव्वीस डिसेंबरच्या गुरुवारच्या सूर्याबरोबरच इचलकरंजीत साहित्य संमेलनाचे प्रतिनिधी उगवू लागले. गावाच्या वेशीपासूनच स्वागत हार्दिक स्वागत वगैरेचे बॅनर्स फडकत होते. एकूण तमाम इचलकरंजीला उत्साहाचा झटका आला होता. गावातल्या तमाम शाळांना साहित्य संमेलना निमित्त तीन दिवस सुटी जाहीर करण्यात आली होती. गावातले मराठी जाणणारे जवळ जवळ सारेच लोक आपल्याच घरचं कार्य असल्याच्या उत्साहानं आणि कर्तव्य भावनेनं संमेलनाला आलेल्या परगावकरी प्रतिनिधींची ऊठबस करीत होते. एकूण गावात आनंद होता.

इचलकरंजी या गावाच्या श्रीमंतीबद्दल शाळेत असल्यापासून ऐकून होतो. महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणजे इचलकरंजी हे मी इयत्ता सातवीतच भूगोलाच्या परीक्षेच्या आधी पाठ केल्याचं आठवतं. पण अभ्यासात समजलेल्या गोष्टी व्यवहारांत जशाच्या तशा असण्याचा योग पहिल्यांदाच आला. इचलकरंजी अक्षरशः मँचेस्टर आहे. प्रत्येक घराच्या मागे गोठा असावा तसे हातमाग आणि यंत्रमाग आहेत. घराघरातून कापडाचे तागे बाहेर पडतात आणि घसघशीत लक्ष्मी घरात शिरते. त्यामुळे गावातल्या छोट्या–छोट्या रस्त्यांवरून मोटार सायकली सर्रास धूळ उडवतात. नाक्या नाक्यावर चौक आणि पुतळे दिसतात. गल्ली बोळातल्या हॉटेलांमधून भजी प्लेटच्या ऑर्डरी दिल्या जातात. साहित्य संमेलनाकरता लाख लाख रुपयांचा निधी गावातून बघता बघतां जमा होतो.

गावाच्या मध्यभागी गोविंदराज हायस्कूलचे पटांगण. कुठल्याही ‘अधिवेशन’ या संज्ञेला शोभेल असा प्रचंड मंडप. प्रशस्त व्यासपीठ. न मोडलेल्या व्यवस्थित खुर्च्या. कुणालाही त्रास होणार नाही अशा कोपऱ्याच्या पण मोक्याच्या ठिकाणी केलेली चित्रवाणी आणि फिल्म्स डिव्हिजनच्या चित्रीकरणाची व्यवस्था. इचलकरंजी नगरपालिकेच्या बंबानं दिवसातून तीनदा पाणी शिंपल्यामुळं येणारा मातीचा वास. ध्वनीक्षेपकाच्या वाजवी घशातून निघणारा प्रभा अत्रेचा मालकंस. एकूण चक्क आनंदी वातावरण.

मध्येच पु. ल. गडबडीनं इकडे तिकडे धावताना दिसतात. त्यांच्या मागून चारपांच स्थानिक कार्यकर्तेही. नगराध्यक्ष पंडितराव कुलकर्णी आणि कार्याध्यक्ष वसंतराव दातारांची धावपळ चाललेली. संमेलनाला उपस्थित रहाण्याचं यशवंतराव चव्हाणांनी कळवलेलं असतं. त्यावेळी निदर्शनं वगैरे होऊ नयेत याची खास दक्षता ते घेतात. भीमराव कुलकर्णीसुद्धा जमेल तितकी घाई करीत असतात.

संध्याकाळचे चार. मराठी साहित्य संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवी

पृष्ठ २१ वर



होय,
मी त्याला ती परत
द्यायलाच हवी–
अगदी त्या बक्षिसीच्या
पैशांसकट !
माझा हक्क काय
त्या भाग्यावर ?....

# चिडे का मौन तरी आतले....

श्रीधर इनामदार

मी एक लांब श्वास घेतला, आणि पाय हलवीत दूर पहात बसून राहिलो.

ही जागा मला फार आवडते ! पाठीमागे आगगाड्याचे आवाज स्टेशनच्या कानात भरून राहिले आहेत उजव्या हाताला एस्. टी. मुक्कामाला आहे. समोर वाहाता, शहरात घेऊन जाणारा, राजमार्गाला मिळणारा वळणाचा रस्ता दिसतो. लांब क्षितिजावर डोंगराच्या गंभीर पुसट रेषा. काही वृक्षांचे घन हिरवे विस्तारही आहेत.

मी क्षणमात्र डोळे मिटले, आणि उघडले. या सगळ्या चैतन्याने, हालचालीने, सळसळणाऱ्या परिसरातच एक असाही प्रदेश मिसळलेला आहे, ज्याचे या धावपळीशी नाते आहे, परंतु व्यवहार नाही. एका रागाच्या गीतात दुसरा बेमालूम मिसळून जावा, फुलावा, नादावा–तसाच–भटक्या, फिरस्त्या जमातीचा एक सबंध काफिला इथे वसला आहे. चटया विणीत, बाबू ताशीत, काहीबाही करीत. इथल्या बायका उद्योगात दिसतात. त्यांचे कसे काय चालते, देव जाणे. पुरुष माणसे कोठे जात असावीत? उद्योग ? ही काय–उघडकीच तर हिंडणारी ही क्षिपरी पोरे–याच्या 'उद्या'चे काय? याना हा गारठा लागत नाही काय ?

–मी मात्र सदऱ्याची गळ्याजवळची गुंडीही लावून टाकली. प्रश्न पुष्कळ होते, आणि ते माझ्याच समोर होते ! ज्याच्याबद्दलचे, ते हे लोक मात्र छान आनंदात !

चांगला कारभार आहे ! किंचित् रागानेच उठलो, आणि माझ्याकडे बोट दाखवून हसणाऱ्या, पोराच्या डोक्यात गजिफ्रॉक्चा गळा घुसविण्याची धडपड करीत असलेल्या त्या एका बाईजवळ जाऊन हात नाचवीत सतापाने विचारले, हसायला काय झालेय् ?'

करवतीसारखे धारदार शुभ्र दात पुनः दाखवून बाई अर्धवट पोराला, अर्धवट मला बोलली, 'साह्यबाक् ठंड लागती ! तोहे'–साहेवाला–मला–थंडो वाजते बघ ! तुला ?

तिची भाषा कळत नव्हती, आशय सांपडत होता. गेले कैक दिवस संध्याकाळचा इथे येऊन बसत होतो. तिच्याशी याच अर्धभाषेत एकदा शब्द बोलत होतो, या लोकाच्या आयुष्याचे मनोमन नवल करीत होतो.

'काय ठरविलेस बोल मग ! ' मी मुद्याचे बोललो, 'केवढ्याला द्यायची ती मूर्ती ?'

तिला तरी कोठे कळत होते माझे सांगणे ! तिच्याजवळ गबाळात गुंडाळलेली एक वस्तू होती–एक मूर्ती दगडाची. कर्मधर्मसंयोगाने त्या दिवशी अशीच ती माझ्या 'नदरं'ला पडली, आणि या भटक्या बाईजवळ कोहिनूर दिसता तरी जेवढा दिपून गेलो नसतो, तेवढा मी वेडावून गेलो.

तो एक आडव्या अंगाचा राक्षस होता–असावा. दैत्य म्हणा, देव म्हणा. रूप अक्राळविक्राळ होते. मुद्रा भयंकर! परंतु या सगळ्या भीषणाला एका मऊ गोडव्याने न्हाऊ घातले होते.

–तो अस्त्र उगारणारा हात पहा. अस्त्र धारधार आहे. परंतु आविर्भाव लहान पोराला कृत्रिम चापटी लगावण्याचा. पाय थैमान घालण्याच्या आवेशात आहेत, परंतु माजर पायात घोटाळावे, तसे गडबडलेले, वटारलेले डोळे पाहून मला माझ्याकडच्या एका योगासनाच्या चार्टची आठवण झाली त्या चार्टवर वेगवेगळ्या आसनाच्या मुद्रा दाखविलेल्या होत्या. आमच्या बधूंना त्याचा काय उपयोग झाला असेल तो असो, लहान मुलांना भीती घालून कामे चटकन् करून घ्यायला मात्र त्यातील काही पोझेस्मधील आसनस्थ मंडळी फार उपयोगी पडली ! तसेच या मूर्तीनेही डोळे वटारलेले दिसत होते, गाल फुगविले होते, जबडा उघडून कराल दाढाचे अस्पष्ट दर्शन घडविले होते !

मी आनंदून गेलो. मला पाहिजेच ही चीज ! मी काही कोणी मोठा, जबरा कारागीर लागून गेलो नव्हतो; परंतु ही वस्तु घडविणाराचे मला मनोमन कौतुक मात्र वाटले.

बाईला मी विचारले; आणि तिने सरळसरळ नकार दिला. तिचे म्हणणे पोराला खेळायला मूर्ति हवी ! पोरापेक्षा मीच अधिक हटून बसलो, तिला परोपरीने समजावले. अशा वेळी पैसे नाहीत उपयोगी पडत ! वेळ बरी असली तर किंमत देता येणार नाही एवढे काम विना पैशाने होते, नाही तर पाच रुपयांच्या ठिकाणी पन्नास देऊन मनासारखे काम होत नाही, हे मी जाणून होतो. अर्थात तेही मी बाकी ठेवले नाही. तिला चांगले पैसेही मी देऊ केले, एकाद्याने मला त्या वस्तूबद्दल तेवढे दिले असते, तर मी विचारही न करता म्हणालो असतो, 'चल उचल ! ठेव पैसे !' पण बाई पक्की ! तिच्या टोपल्या, बास्केटे, दुरड्या, मी पाहिल्या. तिचे विणकाम चांगले होते. त्याला 'पेडग्' बाजारपेठ गाठून देण्याचे आमिष दाखविले. मिळेल त्या दुकानात या वस्तु मिळेल त्या किमतीला यांना विकाव्या लागतात; एकाद्या भल्या फॅन्सी व्यापाऱ्याशी मी तिचा व्यवहार जुळवून दिला असता–पण छे ! बाई मुळीच ऐकत नव्हती.

मीही हट्टाला पेटलो. तिला हवे तरी काय होते ? 'दोडाक् खिळाक्. होन्'– तिच्या पोराला खेळायला ती मूर्ती लागत होती ! मी मान डोलवली. आमच्याकडच्या पोरांनी या वस्तूला हात लावला असता, तर मी माझे डोके धडापासून वेगळे केले असते ! असू द्या. तिच्या पोराला त्याच्या बदली एक अप्रतिम खेळणेही मी लपवून नेऊन देऊ केले–घरी दिसले असते, तर बंधूच्या पुत्रांनी माझा जीव घेऊन ते नाचणारे क्षिपरे अस्वल हस्तगत केले असते–

कसले काय, बाईने मला समजेल धुडकावूनच लावले. माझे पैसेही त्या खेळण्यात घालवून बसलो, मनस्ताप तर मोजायचाच नाही; हेलपाटे पाण्यात, या नाटकाने तिथले सगळे बगलेवालेसुद्धा–मला ओळखून हसू लागले–आणि पदरात पडले काय ? मीच बाजारात जाऊन तावातावाने खरेदी करून आणलेले ते, मलाच वेडावून नाचणारे अस्वल !

माझा दणक्याचा दणक्या अपमान झाला होता. तोंड आरशात पहायचीही लाज वाटायची पाळी आली होती. पराभव छानपैकी झाला होता. ते जाऊ द्या. अशा बाबतीत अपमानापेक्षा हळहळ जास्त लागते ! मत्सर जागा होतो–खरेच, काहीही म्हणण्यासारखे जवळ नसलेल्या त्या बिचाऱ्या बाईबद्दल मला मत्सर वाटायला लागला. मी स्वतः कोरीव काम करणारा–परंतु ती वस्तु म्हणजे वस्तु होती–तिची भरपाई कशानीही होणार नव्हती.

त्या क्षुद्र बाईला मी मनोमन शिव्या दिल्या. ती मूर्ति कोणी चोरूनसुद्धा नेईल, अशीही माझ्या मनावर फुंकर घातली. शक्यच नव्हते म्हणून; नाहीतर चोरण्याचे ते काम

मीही करून टाकले असते ! माझा सगळा शहाणपणा अत्तरासारखा उडून गेला असून, रिकाम्या खोक्यासारखा मी खिळे बाहेर आलेला असा उरलो आहे, असे काहीतरी चमत्कारिक पोकळ वाटू लागले–

गप्प बसलो झाले !

¤

साहेबमजुकरांनी बटन दावले, आणि दिव्याच्या प्रकाशापेक्षा त्याच्या शेड्नेच मी दिपलो. प्रशस्त अंगाचा मन्यासाहेब रुंद हसून म्हणाला, 'काय कशी काय चीज ?' आणि लगेच बोलला, 'त्या ह्या 'ने परवाच दिली प्रेझेंट् !'

मी मान डोलावली. मन्यासाहेबांवर असे 'ते हे'–फार लोक फिदा असतात ! मन्यासाहेब माझे जुने, दोस्तान्यातले गिऱ्हाईक. घरबांधणी, रोड-आखणी, अशा कितीतरी सरकारी खात्यातला मनुष्य. पगार एक, इन्कम् दोन–असे 'दिन दूना, रात चौगुना'–उत्पन्न ! हातात अधिकार चांगला आणि तो आपला पदर भरण्यासाठी वापरायला हातही तयार ! झालेय् काय माणसे फिदा नसायला ? शेड् चांगली मौल्यवान, पैलूपैलूंची होती. देणाऱ्याचे चांगलेच कल्याण मन्यासाहेबांनी करून दिले असले पाहिजे–माझ्या मनात आले,

'ही पहा !' हातातील वस्तू माझ्याकडे देत साहेब म्हणाले. मला आज मुद्दाम बोलावण्यात आले होते. साहेबांकडे काहीतरी काम करावे लागणार होते.

'या मूर्तीच्या हातांवर आणि पायांवर काहीतरी मस्त–' लठ्ठ बोटाने डिझाइन काढल्यासारखे हवेत दाखवून मन्यासाहेबांनी गाल फुगवीत माझे मत विचारले, 'काय ? कशी काय वस्तू ?'

–मी त्यांच्या त्या 'वस्तू'कडे नजर टाकली आणि विजेने चाटल्यासारखा जागच्या जागी लकाकून गेलो. अंगातून करंट धावत गेला–

तीच ! तीच ही मूर्ती ! तोच हा दैत्य किंवा देव–यक्ष. काहीतरी घोटाळा होता खास !

'ही चीज कुठे लाटली सरकार ?' मी विचारले. सरकारीसाहेब–कोडगेपणा एवढा, माझे बोलणे काही त्याला लागले नाही. मला कोणी असे विचारले असते, तर–पण जाऊ द्या !

मन्यासाहेबांनी लतकोडगे हसत हात उडविला आणि–'अशीच–' वर मला तोडून टाकले. बरोबर आहे ! पायावर पाणी घाल म्हटले, तर साखळ्या केवढ्याच्या ! त्यांनी मूर्ती चोरली असेल, नाहीतर आणिक कशी आणली असेल.

मला एक आसुरी आनंद झाला. त्या इतर गोष्टींशी मला कर्तव्य नव्हते. असण्याचे कारणही नव्हते. मी 'हो–' म्हणालो आणि काम अंगावर घेतले.

चेष्टा नव्हती ! मूर्तीवर कोरून डिझाइन काढण्याचे हे काम साधे–सोपे–सरळ नव्हते. कामाचे काही तास डिझाइन निश्चित करून त्याची आखणी करण्यातच गेले. मूळ कामाबरोबर संवाद साधील, असे डिझाइन करण्यात मी यशस्वी झालो, तोवर समयपुरुषाने बरेच दिवस सावळे झालेले पाहिले होते.

दरम्यान मीही स्वस्थ काम करीत बसलो नव्हतो. माझ्या उत्सुकतेने मला बसू दिले नव्हते. एका संध्याकाळी मी रेल्वेस्टेशनच्या किनाऱ्यावरील त्या माझ्या आवडत्या स्थानी पोहोचलो, तेव्हा तेथे काही बदल झाले असल्याचे माझ्या ध्यानी आले. कोणत्याही बदलाचा एक गाडी सुरू होताना बसतो, तसा धक्का बसतोच आणि ज्ञानेंद्रिये त्यामुळे क्षणभर सजग होतात. तेथील भटकी कुत्री एकदम कमी झाली होती. शेळ्या–मेंढ्यांचे जथे जवळजवळ अदृश्य झाले होते. झोपड्या–पालांचा, गवताच्या हाऱ्यांचा, चिंध्या–चिरगुटांचा एक मिश्र वास ओसरला होता. फिरस्त्या जमातीची पाले तेथून हलली होती. तुरळक एकाद–दोन मुरगुशी मारून बसलेल्या पालांमधून तेवढे चुलींचे जाळ दिसत होते, कालवणांचे गरम वास पुसट जाणवत होते.

पहिल्याच पालापाशी मी पोचलो, तेव्हा झापांतून तीच बाई नेमकी बाहेर आली. तेच दिमाखदार, शुभ्र, धारेचे रानहसू तिच्या सदा फुलल्या तोंडभर होते.

'हा काय प्रकार आहे ?' मी खुणेनेच विचारले.

'पोलीस !' तिने सहजगत्या मनगटांवर बोटे फिरवून जबाब दिला.

हे असे होते तर ! कोणीतरी केलेली चोरी सगळ्या वस्तीला भोवलेली दिसत होती. मला वाईट वाटले.

'तुमचे–तुझे काय ?' मी साशंक मनाने विचारले. ती हसू लागली. 'तुझे बाळ ?' मी खुणा करीत म्हटले. तो पोरगा पलीकडेच होता. झोपी गेला होता.

मी मर्मबंधातले बोलणे काढले. 'त्या मूर्तीचे काय ?' मी मुद्दाम विचारले, 'दाखव तरी मला ! आहे ना ?'

–तिचा चेहरा कसा दिसला म्हणून सांगू ? कितीही उद्विग्न, संतप्त झालो, तरी माझ्यामुळे कोणी दुःखी व्हावे, हे मला न हीच सहन होत ! तिची छायांकित मुद्रा पाहून मी वरमून गेलो. तिला मी दुखविले होते. तिच्या नजरेकडे पहाणे मला साधले नाही.

विचार करीतच मी परतलो. मूर्तीचे काम चांगले बाळसे धरीत होते. हळुहळू ती बाई बोलत गेली. मला अंदाज होताच. तसेच घडले होते !




एकाच्या मालकीचा हा प्लॉट. कैक वर्षे शून्य पडून राहिलेला. काहीतरी सरकारी सबब काढून तो त्याच्याकडून काढून घेऊन तिसऱ्याला विकून टाकण्याच्या आमच्या मन्यासाहेबांच्या व्यवहारात ही त्या प्लॉटवर चार दिवस वस्तीला आलेली भटकी माणसे आड आली होती आणि नेहमीच्या चतुराईने मन्यासाहेबांनी त्या अडाण्यांचा काटा काढून टाकला होता. अर्थातच त्यावेळी बेघर होऊन तुरुंगाकडे गेलेल्यांची चीजवस्तू मन्यासाहेबांच्या पंजातून सुटली नव्हती !

कशी कोण जाणे, त्या बाईकडची ही मूर्ती मात्र मन्यासाहेबांना भुलवून गेली आणि तिच्या बदल्यात त्या बाईला आठ-पंधरा मजुरीचे रोज इथे रहाण्याची आयजीच्या जिवावर बायजीप्रमाणे उदार होऊन मन्याजींनी परवानगी दिली होती.

माझ्या मनातल्या मत्सराने आता चांगलेच नवे नवे रंग पांघरले. जे ज्याच्यापाशी असेल ते ओरबाडणारा हा मन्या. त्याच्या भाग्याचाही मला हेवा वाटला ! ज्या मूर्तीसाठी मी जीव अर्धा केला होता, ती याच्या-या ठोंब्याच्या-घरात विनासायास आली होती आणि त्याच्यासाठी मला ती निमूटपणाने नटवावी लागत होती-किंवा माझ्याचसाठी म्हणा ! अर्थ तोच होता !

मी तोंड मात्र मिटून घेतले होते. मनोमन संतापत, चिडत का होईना, काम पूर्ण केले. टोकाला नेऊन लावले. मूर्तीला साजेल, शोभेल-अर्थासच मूळ कामाच्या नखाची सर माझ्या कामाला नव्हतीच, परंतु त्याचा मागोवा घेत जावे, तसे नक्षीकाम करून मी पूर्ण केले-

-आणि जसे काम हातावेगळे झाले, तसा तो मत्सर मला पुन्हा घेरून बसला. काय वाटेल ते करावे, परंतु ही मूर्ती हातची सोडूच नये, असे वाटू लागले. त्यातून माझ्या याही कामाची, पाहिले त्या प्रत्येकाने प्रशंसा केली होती. काम सुंदर जमल्याचा आवर्जून निर्वाळा दिला होता. एवढे मनोमन ठसलेले काम; त्या चोराला काय म्हणून मी परत द्यावे ?

आता माझ्या मनाने त्या मत्सरालाच तत्त्वज्ञानाची पावडर-किंवा भस्म-फासून त्याला गोरेगोमटे बनविले. या मन्याने थोडीच ती मूर्ती घामावर कमावली होती ? एका चोराला लुबाडण्यात काही पाप होते काय ?

परंतु छे ! आदतसे मजबूर होतो. गाडीवान झोपला, तरी बैल गाडी बरोबर ठिय्यावर नेतात-तसे शरिराने मला एका सकाळी कामासुद्धा मन्यासाहेबांच्या दारात नेऊन ठेवले.

-दार उघडले, मन्याच्या छोकरीने 'कोण पाहिजेल ?' बाहुलीसारखी मान, केस, पापण्या डुलवीत तिने विचारले. मी तिच्या ओळखीचा होतो. 'या ना काका !' तिने बंगला हिसका दिला. 'पाहू, पाहू मला काय आणलेयत ते ?'

मी ती मूर्ति तिच्यासमोर धरली, आणि पांच सहा वर्षाच्या त्या पोरीने भेदरून आरोळी मारली, घाबऱ्या घाबऱ्या बाहेर आलेल्या आईला जाऊन घट्ट मिठी मारली-

'उगी, उगी'-बाईसाहेबांनी तिला समजावण्याची शिकस्त केली. तोवर तोंड पुशीत बाहेर आलेल्या मन्यासाहेबांनीही तिला चुचकारून पाहिले, पण व्यर्थ ! ती ऐकतच नव्हती. त्या पाषाणरूपाची तिला भीतीच बसली होती !

'परत न्या ती मूर्ती काय वाटेल ते करा तिचे !' बाईंनी मला निक्षून सांगितले. मी तसा सोडणार नव्हतो !

'माझ्या कामाचे पैसे ?' लाज सोडून विचारले.

निम्मी रक्कम बेफिकिरीने माझ्या अंगावर टाकून मन्यासाहेबांनी माझ्या तोंडावर दरवाजा बंद करून टाकला !

आनंदाने तंगड्या हलवीत मी त्या माझ्या आवडीच्या जागेवर बसलो. भले गड्रू ! याला म्हणावे दैव !

मी समोर पहात होतो. तीच ती बाई ! कोणाशी तरी बोलत होती, आणि बोलता-बोलता, हाती असलेले दोरीचे भिडोळे सहज म्हणून बाजूला झोपलेल्या पोराच्या पाठीवर मारीत होती.

पोर जागे झाले. रडू लागले.

या वनवासी बायकांना त्याचे काही कौतुक नव्हते. त्यांच्या गप्पा रंगात आल्या होत्या, तिचा चाळा चालूच होता-पोराला मात्र तो खेळ असह्य झालेला दिसला.

त्यांतून त्याला सुटायचे होते. आईचे तर लक्षही नव्हते ! पोर आंतल्या आंत चिडल्यासारखे झाले असावे !

मी पहात राहिलो. मौजेने. पोरगा काय करतो ?

-आणि वाहवा, त्या पोराने उपाय काढला. नेमका !

-गडबड लोळतच ते पोर आईपासून दूर गेले, सुटले ! आणि स्वतःशीच-ते पहा, हसते आहे !

आभाळ भरून आले आहे-कदाचित-का, नक्कीच-आनंदाने. मी मात्र पुनः चिंताक्रांत बनलो आहे. या पोराचीच ती मूर्ति.

-होय, मी त्याला ती परत द्यायलाच हवी-अगदी त्या बक्षिसीच्या पैशांसकट ! माझा हक्क काय त्या भाग्यावर ? ☐ ☐



UH 744

# वि.नि.स.च्या न्यायालयावर अपूर्व बहिष्कार



हैदराबाद
मुक्तिसंग्रामातील
अज्ञात कथा
क्रमांक – १०

अशोक परळीकर
परभणी

---

स्वतंत्र भारताची राजधानी दिल्ली. वेळ सकाळची. नऊ वाजलेले. भारताचे गृहमंत्री सरदार पटेल आपल्या खास दालनात विराजमान झालेले. शेजारी भारत सरकारचे एजंट जनरल श्री. कन्हैयालाल मुन्शी उभे– दोघात काही खास बोलणे झालेले. तसे श्री. के. एम्. मुन्शी मार्गदर्शनासाठी आणि सल्लामसलतीसाठी नेहमीच दिल्लीला येत. आजही अशाच काही समस्येबाबत ते सरदार पटेलांना भेटावयास आलेले. हैदराबाद राज्यातील परिस्थितीचा 'आँखो देखा हाल' ते सरदारांना ऐकवीत आहेत. ऐकता ऐकता सरदार पटेलांच्या, एरवी गंभीर आणि निर्विकार चेहऱ्यावर एक बारीक स्मितरेषा प्रकटली. आणि ते नकळत उद्गारले. 'यह बहुत अच्छा हुवा, बहुत अच्छा हुवा !' अर्थातच् समजलेली वार्ता आनंददायक आणि विशेष अर्थाची होती आणि म्हणूनच सरदार पटेलांसारखी गंभीर व्यक्तिसुद्धा उत्तेजित झाली होती.

साधारणतः सरदार पटेलांच्या चेहऱ्यावरून त्यांच्या आंतरिक मनस्थितीचा, भावभावनेचा अंदाज करणे अत्यंत कठीण. त्यांचा चेहरा नेहमी निर्विकार असावयाचा. परंतु आजचे त्यांचे उत्तेजित होणे, चेहरा मृदु व हसरा होणे ही अभिव्यक्ती नक्कीच कुठल्यातरी विशेष कारणामुळे, वार्तेमुळे झाली असणार. ज्या कारणामुळे लोहपुरुष सरदारही आनंदीत झाले ती घटना कोणती होती ? एखाद्या कठीण समस्येचे उत्तर तर त्यांना मिळाले नव्हते ना ? एखादा अवघड प्रश्न आपोआपच सोपा झाला होता की काय ? काय, घडले काय होते ?

धूर्त व कूटनीतिकुशल आंग्लसाम्राज्यवाद्यांनी विवश होऊन भारताचे स्वातंत्र्य घोषित केले. परंतु सहजासहजी आणि अडचणीशिवाय स्वातंत्र्याचे माप पदरात घालणे कसे शक्य होते ? त्यांनी अशा काही समस्या निर्माण केल्या की भारत त्यामध्ये सदासाठी गुंतून राहील, कधीही मुक्त होऊ शकणार नाही आणि म्हणून पर्यायाने आपले डोके कधीही उंचावू शकणार नाही. साम्राज्यवादी परंपरेप्रमाणे त्यांनी देशाचे विभाजन केले. अर्थात भारत आणि पाकिस्तानची निर्मिती झाली. कोरिया, व्हिएतनाम, लाओस, जर्मनी, भारत आणि फिलिस्तान– ज्या ज्या राष्ट्राला या गोरांग्यांचा पदस्पर्श झाला त्या त्या ठिकाणी यांच्या पांढऱ्या पायाची आठवण कायम फुटीर बीजांच्या रूपाने अस्तित्वात आहे. परंतु भारताच्या बाबतीत केवळ विभाजनाने समाधान झाले नाही म्हणून की काय अजून एक राक्षस उभा करण्यात आला. हा राक्षस म्हणजे देशी नरेशांना स्वतंत्र राहाण्याची सूट. ३ जून १९४७ च्या घोषणेनुसार त्यांनी भारतातील राजेरजवाडे, संस्थानिकांना भारतात वा पाकिस्तानात विलीन होण्याचे अथवा स्वतंत्र राहाण्याचे स्वातंत्र्य दिले. या घोषणेने भारतात आंतरिक गृहकलहाला जणू खतपाणी मिळाले. परंतु भारताचे भाग्य थोर म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नाला यश आले. आणि विना रक्त सांडता भारतातील जवळजवळ सर्व लहानमोठी संस्थाने भारतात विलीन केली गेली. गृहकलहाचा प्रसंग उद्भवलाच नाही. अर्थात सर्व श्रेय सरदार वल्लभाई पटेलांना देणे न्यायोचित आहे. त्यांच्या या महान कार्याचे संस्मरण आम्हाला आणि इतिहासाला राहाणे अत्यावश्यक आहे. सरदार वल्लभाईंच्या कार्याचेच नव्हे तर त्यांचेच विस्मरण आम्हाला होते आहे हे आश्चर्यजनक आहे. हे वर्ष खऱ्या अर्थाने हैदराबाद संस्थानातील लोकांच्या मुक्तीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे आणि योगायोगाने सरदारांच्या जन्मशताब्दीचेही हे वर्ष आहे. त्यांचे पुण्यस्मरण जाणीवपूर्वक होणं अत्यावश्यक आहे. दुर्दैवाने सध्याच्या राजकारण्याना आणि सत्ताधारकांना वीरपुरुषांचे खऱ्या अर्थाने पुण्यस्मरण नको आहे. अस्तु.

हैदराबाद संस्थानाने भारतात विलीन होण्यास नकार दिला होता. हैदराबादचा निझाम आणि त्याचे हस्तक– विशेषतः मजलीसचे तानाशाह कासिम रझवी, हैदराबादला स्वतंत्र इस्लामी राज्य बनविण्याचे स्वप्न उराशी बाळगून होते. निझामाने, आपला वैशिष्टयपूर्ण भूमिका असलेले नाटक रचून अगदी कमाल केली. ते नाटक म्हणजे, 'हिंदू आणि मुसलमान प्रजा म्हणजे माझे दोन डोळे आहेत. दोघेही मला दोन डोळ्याइतके प्रिय आहेत– आणि म्हणूनच पाकिस्तानात विलीन व्हावे तर हिंदू नाराज होणार आणि हिंदुस्थानात विलीन झाल्यास मुसलमान रुष्ट होणार म्हणून प्राप्त परिस्थितीत हैदराबाद राज्याचे स्वतंत्र राहाणेच योग्य आणि औचित्यपूर्ण राहील.' हे होय. या प्रकाराने महत्त्वाकांक्षी आणि धर्मांध निझामाने आपल्या स्वतंत्र राहाण्याच्या अधिकाराचे समर्थन केले आणि एका विशेष 'फरमाना'-द्वारे स्वतंत्र रहाण्याची घोषणाही केली.

परंतु वस्तुस्थिती अशी होती की राज्यातील बहुसंख्य असलेली हिंदू प्रजा निझामाच्या स्वातंत्र्याच्या आणि तानाशाहीच्या विरुद्ध होती. त्यांचे मागणे होते की हैदराबाद राज्याने धर्मनिरपेक्ष भारतीय संघराज्यात विलीन व्हावे आणि राज्यात जबाबदार लोकतांत्रिक शासन स्थापित व्हावे. हैदराबाद स्टेट काँग्रेस या मागणीसाठी कृतसंकल्प आणि संघर्षरत होती. अर्थात् या बाबी निझामाच्या निरंकुश आणि धर्मांध शासनाच्या नीतीविरुद्ध होत्या. आपल्या प्रजेच्या या स्वाभाविक मागणीस चिरडून टाकण्यासाठी, निझामाच्या प्रोत्साहनाने हैदराबाद राज्यात मजलिसे इत्तेहादुल मुसलमीन नावाची सांप्रदायिक संघटना कार्यरत होती. निझाम आणि त्याच्या निरंकुश सत्तेचे ते कट्टे समर्थक होते. प्राप्त परिस्थितीशी टक्कर घेण्यासाठी एका सेनेची, रझाकार संघटनेची, निर्मितीही केली गेली. त्या सेनेचा सालारे आझम–सेनापती क्रूरकर्मा हिंदूद्वेष्टा कासिम रझवी होता.

१५ ऑगस्ट १९४७ पासून आपल्या या मागणीसाठी स्टेट-काँग्रेसने आंदोलनास प्रारंभ केला. सत्याग्रहाला आरंभ झाला. या सत्याग्रहाला विरोध असणाऱ्या हिंदूंनीही सत्याग्रहात भाग घेतला हे विशेष. सत्याग्रहींना पकडण्याचे सत्र सुरू झाले. निझाम शासनाला अनपेक्षित असे या सत्याग्रहाचे स्वरूप होते. या सत्याग्रहाच्या आंदोलनाला चिरडून टाकण्यासाठी निझामी शासनाने दमननीतीचा अवलंब केला. सहस्रावधी सत्याग्रही गजाआड केले गेले तरीही सत्याग्रहाचा जोर ओसरला नाही. सत्याग्रहाच्या या वाढत्या लाटेला प्रतिबंध करण्यासाठी निझाम शासनाने आणि समर्थक मजलीसने सर्व वैध आणि अवैध मार्गाचा अवलंब केला. तुरुंगातही सत्याग्रहींना मारहाण करण्यात आली–केली जाई. निझामाबादचे ‘जेलकांड’ या अन्यायाचे एक जिवंत उदाहरण आहे. ११ जानेवारी १९४८ रोजी, दिवसाढवळ्या, बाहेरील गुंडाकरवी तुरुंगातील राजकीय कैद्यांना भीषण मारहाण करवली. या प्रकाराची तीव्र प्रतिक्रिया म्हणून लायकअली मंत्रीमंडळातील एक मंत्री श्री. रामाचार्यजी यांनी आपल्या पदाचा त्याग केला. एकीकडे दशसहस्रापेक्षा जास्त सत्याग्रही तुरुंगात अमानुष बंदीजीवनाच्या यमयातना भोगीत होते, विद्यार्थी शाळा-कॉलेजावर बहिष्कार टाकून स्वाधीनता संग्रामात उतरले होते, तर दुसरीकडे रझाकाराचे दमनचक्र पूर्ण शक्तीनिशी प्रगतीशील आणि स्वाधीनता प्रिय शक्तींना चिरडून टाकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. निराश्रित जनता विवश होऊन लाखोंच्या संख्येने भारतीय संघराज्यातील गावात आश्रयार्थ जात होती. गावेच्या गावे ओस पडत चालली होती. राज्यात अन्याय, अत्याचार, बलात्कार, जाळपोळ यांचे मुक्त थैमान चालू होते. अनेकांना गोळ्या घालण्यात आल्या, अनेकजण जखमी झाले. अनेकांना जिवंत जाळण्यात आले, अबलावर अकथनीय अत्याचार झाले. समाचार पत्रांचे तोंड शासनाने दाबलेले त्यामुळे सत्यपरिस्थिती बाहेरील जगाला कळणे शक्य नव्हते. स्टेट काँग्रेसने आपल्या आंदोलनाची सूत्रे ‘बाहेरून’ संचलित आणि नियंत्रित ठेवली. यामुळे निझाम आणि त्याचे हस्तक यांच्या हातात अनिर्बंध, निरंकुश सत्ता, सत्याग्रह मोडून काढण्यासाठी आली.

हैदराबाद राज्यातील हिंदूवर होत असलेल्या अन्याय, अत्याचारामुळे भारत आणि हैदराबाद सरकारात तणाव निर्माण झाला. निझामाने जाणले की भारत सरकार त्याच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीला कधीही मान्यता देणार नाही. तेव्हा आपली मागणी, आपला अधिकार, आपली प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्यासाठी एकच मार्ग आणि तोच मार्ग हाताळावयाचा, स्वीकारायचा असे निझामाने ठरविले आणि तो मार्ग म्हणजे भारताशी युद्ध ! त्याने भारताशी लढाई करण्याची तयारी चालविली. ‘इस्लाम खतरे मे है’ असे सांगून आपल्या स्वार्थासाठी मुस्लिमांची संघटना बांधण्यास सुरुवात केली. सैन्यात भरती आरंभली. भारतातील मुसलमानांना प्रलोभने दाखवून त्यांना मोठ्या संख्येने आपल्या राज्यात आणले. शस्त्र निर्मितीचा कारखाना उभारला



बाहेरच्या 'मित्राकडून' शस्त्रास्त्रांची मदत मिळविली. U. N. O. मध्ये आपला प्रतिनिधी पाठविण्याचे निश्चित केले. एकूण तयारी वेगात सुरू झाली पण त्याला वेळ लागणार होता. अशा परिस्थितीत एकीकडून अशी सर्व तयारी चालू असता दुसरीकडून भारताशी युद्धाची तयारी करण्यासाठी आवश्यक वेळ मिळावा म्हणून बोलाचालीचे नाटकही चालू ठेवले. राज्यात प्रातिनिधिक शासनाची मागणी केली जात होती तेव्हा मजलिसचे मनोनित लायकअली हैदराबाद राज्याचे प्रधानमंत्री बनविले गेले. त्यांच्या या प्रातिनिधिक सरकारात काही हिंदू मंत्रीही घेण्यात आले. परंतु मंत्री कसे तर ज्यांना स्वतःच्या समाजात प्रतिष्ठा नव्हती, स्थान नव्हते, मान नव्हता, मंत्रीमंडळात प्रभाव नव्हता. नाममात्र मंत्री. केवळ हिंदूंनाही प्रातिनिधित्त्व दिले गेले हे दाखविण्यासाठी त्यांना निवडले होते असे म्हटले जाते. अस्तु.

भारत सरकारविरुद्ध जहरी प्रचाराचे सत्र चालू होते. हिंदूंच्या आंदोलनाला नेस्तनाबूत करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी आणि त्यांच्या हस्तकांनी असे पाशवी अत्याचार केले की आंदोलन थोडेसे थंड पडले. प्रत्येक गोष्टीला एक मर्यादा असते. हैदराबाद सरकारने प्रचार चालविला की भारतीय एजंटांनी आंदोलनाचे नाटक सुरू केले; आंदोलन म्हणजे भारत सरकारची खोडी आहे. अन्यथा आमच्या प्रजेला या आंदोलनाशी काही देणे-घेणे नाही. आमची प्रजा अशा कारस्थानात कधीही भाग घेणार नाही. आपले रास्त (!) म्हणणे बाहेरच्या जगाला कळावे म्हणून निझामाने बाहेरच्या काही अनुकूल पत्रकारांना आमंत्रित केले आणि स्वतः निवडलेल्या काही भागातून त्यांचा फेरफटका करविला. हैदराबाद राज्यातील समाधान आणि शांतीच्या सुखद दृश्यांचे दर्शन त्यांना 'घडविले.' शासन सुधारण्यासाठी अवलंबिलेल्या अनेक बाबींचा विस्तारपूर्वक परिचय देण्यात आला. हिंदू युनियनचा दुराग्रह आणि विस्तारवादिता आपल्या राज्याला अवैध रूपाने कसा त्रास देत आहे याचे रसभरीत वर्णन त्यांना ऐकविण्यात आले. निझामाने भारतीय संघराज्यात विलीन व्हावे म्हणून हिंदू युनियन करीत असलेल्या अवैध मार्गाचा शब्दचित्रपट त्यांना दाखविण्यात आला. हैदराबाद राज्याला स्वतंत्र रहाण्याचा अधिकार आहे परंतु भारत सरकार आमच्या या वैध अधिकारावर अवैध मार्गाने आक्रमण करीत आहे. त्यांच्या या वागण्यामुळेच आमच्या राज्यात मोठा विचित्र पेच निर्माण झाला आहे असे निझामाने त्यांना सांगितले. निझामाने आपल्याकडून भारतावरच चिखल फेक करण्याचे कार्य हस्ते परहस्ते चालू ठेवले.

एकूण परिस्थिती अत्यंत असमाधानकारक होती. भारत सरकारलाही चमत्कारिक पेच पडला होता. काय करावे? कसे करावे? या प्रश्नांना समाधानकारक उत्तर नव्हते. सगळीकडे भीषण अंधार. आशेचा एकही किरण दिसत नव्हता.

१९४८ सालचा फेब्रुवारी मास. दि. २५




सकाळची वेळ. नऊ–सव्वानऊपासून श्रीमान विनायकराव कोरटकर विद्यालंकार यांच्या घरी शहरातील वकील मंडळी यावयास लागली. पहाता पहाता संख्येने शतक ओलांडले. आणि नियोजित वेळी वकील मंडळींची मिरवणूक त्यांच्या घरापासून हायकोर्टच्या दिशेला निघाली. या मिरवणुकीत मोटारींची लांबच लांब रांग होती. त्या भयप्रद दिवसात गणवेश घालून मिरवणूक निघे ती केवळ रझाकारांची. पण आज आश्चर्य म्हणजे गणवेशातील वकील अतिशय शांतपणे, पूर्ण गणवेशात हायकोर्टकडे मिरवणुकीने निघाले होते. एकूण प्रकरण लक्षात न येण्याजोगेच होते. वकील मंडळी आणि मिरवणूक ! कोणता अन्याय घडला होता ? सारी प्रजा आणि शासन विस्मित झाले होते. विधिज्ञांची ही मिरवणूक मुख्य रस्त्यावरून सरकत सरकत उच्च न्यायालयाच्या आवारात आली. तेथे येताच बॅरिस्टर विनायकराव विद्यालंकार आपल्या सहकाऱ्यांसमवेत, मुख्य न्यायमूर्ती खलीलुजम्मा सिद्दीकीला भेटले आणि त्यांनी मुख्य न्यायमूर्तींना शहरातील १२९ मान्यवर वकिलांच्या स्वाक्षऱ्या असलेले एक निवेदन दिले. ते निवेदन असे—

श्रीमान मुख्य न्यायाधीशसाहेब
उच्च न्यायालय, सरकारअली

आपल्यासमोर काही कटु सत्य आणि वस्तुस्थितीचे यथार्थ निवेदन करण्यासाठी आम्ही उपस्थित झालो आहोत, त्याबद्दल आम्हास खेदही वाटतो आहे. एक बाब निःसंदेह स्पष्ट आणि सत्य आहे की (BAR) बार एक जबाबदार 'संस्था' आहे. जिचे आद्य कर्तव्य आहे की न्यायदानात न्यायालयाला उचित सहकार्य द्यावे. त्याचबरोबर ही संस्था नेहमीच शांतीस्थापना आणि अन्य महत्त्वपूर्ण राजकीय समस्यांबाबत जनतेला आणि शासनाला योग्य मार्गदर्शन करीत आली आहे. या संस्थेला समुचित अभिमान वाटतो की प्रसंगी कर्तव्य निभावीत असता अनेक प्रकारे त्यागही आम्ही केला आहे. आम्हाला या गोष्टीची पूर्ण कल्पना आहे की श्रीमान शासन वर्तमान परिस्थितीबद्दल अनभिज्ञ नाही. तरीही आपले कर्तव्य जाणून आणि सद्यःपरिस्थितीला लक्ष्य करून काही घटनांकडे आपले लक्ष विशेष रूपाने वेधणे; आकृष्ट करणे आम्हाला अत्यावश्यक वाटते.

प्रत्येक शासनाचे आद्य कर्तव्य आहे की राज्यात शांती आणि सुव्यवस्था ठेवावी. परंतु आम्हाला खेद वाटतो की आमचे सरकार या प्राथमिक कर्तव्य पालनाबाबत असफलच नव्हे, तर वस्तुस्थिती अशी आहे की शासन यंत्रणा निष्क्रिय आणि निरुपयोगी ठरलेली आहे. आपल्या राज्यात बऱ्याच कालापासून लूटमार आणि मारकाटचे सत्र मोठ्या प्रमाणावर चालू आहे. प्रत्येक दिवशी नवी घटना. परंतु या शांतिविघातक कार्याबद्दल आमच्या सरकारने कोणतेही परिणामकारक पाऊल उचलले नाही. उलट त्या कुकृत्यांवर पांघरूण घालण्याचाच अश्लाघ्य प्रयत्न केलेला आहे. परिणामतः गुंडांना प्रोत्साहन मिळाले. आणि परिस्थिती इतकी बिघडली की आपल्या राज्यात दिवसाढवळ्या संगठीत आणि सशस्त्र टोळ्या गरीब आणि असहाय्य गावावर आणि नगरवासियांवर अनेक प्रकारे अत्याचार करून त्यांचे वित्त लुटीत आहेत, पाशवी मारहाण आणि हत्त्या करताहेत, घरंदारं जाळण्यात येत आहेत, असहाय्य आणि विवश महिलांवर बलात्कार होत आहेत. प्रत्येक दिवशी नवनव्या घटना कानावर येताहेत. अनेक गावे नष्ट झाली आहेत. परंतु या अत्याचारी लोकाविरुद्ध कोणतीही कारवाई केली जात नाही. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे पोलीस त्यांच्या कृत्यांकडे दुर्लक्ष करतात. एवढेच नव्हे तर स्वतःच्या तत्त्वा आणि कर्तव्याविरुद्ध त्यांना सहकार्य आणि सहाय्य देतात. कधीकधी हेही त्यांच्याबरोबर 'सक्रिय' असतात. परिणाम स्वरूप या गुंडांच्या टोळ्या, अनेक प्रकारच्या शस्त्रांनी सज्ज अशा सेनेत रूपांतरीत होत आहेत. लाखोंच्या संख्येत यांची भरती होते आहे, कवायत घेतली जात आहे. आधुनिकतंत्र हत्यारांचे पद्धतशीर शिक्षण (चालविण्याचे) दिले जात आहे आणि शासन उघड उघड त्यांना मदत आणि प्रोत्साहित करते आहे. या विनाशकारी परिस्थितीकडे आपल्याकडील अनेक जबाबदार व्यक्तींनी आणि वृत्तपत्रांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, ओरड केली. परंतु हे सर्व अरण्यरुदनच ठरले. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सांप्रदायिक आणि बेजबाबदार वर्गाविरुद्ध एकादी परिणामकारक कारवाई करण्याऐवजी शासने सांप्रदायिक विष पसरविण्यास त्यांना मदत करीत आहे आणि दुसरीकडे शांतीप्रिय नागरिकांना आणि वृत्तपत्रांना (एकता आणि



सामजस्याचे पुरस्कर्ते आणि कार्यकर्ते) त्रास दिला जात आहे. वृत्तपत्रावर बदी आणण्यात येत आहे आणि शेकडो व्यक्तींना—ज्यात अनेक सन्माननीय विधिज्ञही आहेत—अकारणच तुरुगात डांबले आहे.

शासनाच्या या विनाशकारी नीतीचा परिपाक म्हणून जनतेचे प्राण आणि वित्त, इज्जत आणि अब्रू धोक्यात आहेत. या सकटामुळे सहस्रावधी परिवार राज्याबाहेर निराश्रिताचे आयुष्य कठीत आहेत. शेकडो गावे ओस पडली आहेत, पिके नष्ट होताहेत गरीब ग्रामवासी जगलाकडे आश्रयार्थ पळत आहेत. राज्यातील सर्व व्यवस्था पार कोलमडून पडली आहे. तात्पर्य सर्वत्र अराजकता पसरलेली आहे.

या विदारक परिस्थितीमुळे आमची मनःस्थिती नष्ट झाली आहे. तेव्हा राज्यात पूर्ववत शांती आणि सुव्यवस्था स्थापित होईपर्यंत, आम्ही आमचे काम बद ठेवण्याचे, सद्सद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेने ठरविले आहे.

परंतु मुख्य प्रश्न असा की या परिस्थितीत सुधारणा कशी करता येईल? याचेही अत्यत स्पष्ट आणि सरळ उत्तर म्हणजे 'लोकतांत्रिक शासनाची स्थापना'. राज्यातील जबाबदार वर्गाकडून या मागणीचा सतत पाठपुरावा होतो आहे आणि आमचीही अशी स्पष्ट धारणा आहे की राज्यात जबाबदार लोकतंत्र अमल सुरू होईपर्यंत शाती आणि सुव्यवस्था स्थापन होणे आता अशक्य आहे.

याप्रसगी आम्ही आपणास विनम्रतापूर्वक सागू इच्छितो की आमच्या या निर्धाराचा हेतू न्यायालयाचा अपमान करण्याचा नाही. दुसरे, आमचा सबध कोणत्याही साप्रदायाशी अथवा राजकीय पक्षाशी नाही. राज्यामध्ये जी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे विचलित आणि विवश होऊन न्यायालयावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. आमच्या बहिष्काराचा एकमात्र उद्देश म्हणजे वर्तमान अराजकतेची स्थिती बदलून राज्यात शाती स्थापन करण्यास सहाय्य देणे आणि हुजूर निझामाच्या छायाछत्राखाली जबाबदार लोकतांत्रिक अमल स्थापन करण्यास राज्यास सहकार्य देणे हा आहे.

तेव्हा या निवेदनाद्वारे आम्ही घोषित करतो की जोवर राज्यात शांती आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली जात नाही तोवर न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकतो आहोत आणि अत्यंत विषादपूर्ण आणि दुःखित अतःकरणाने आपणापासून दूर होतो आहोत. आम्हा सर्वांस त्या सर्वशक्तीशालीचा पूर्ण विश्वास आहे की लौकरच राज्यात पूर्ववत शाती आणि सुव्यवस्था नादेल आणि आम्हीही लौकरच आपल्या सेवेत रुजू होऊ आणि योग्य मनस्थितीत न्यायालयीन कर्तव्यात भाग घेण्यास समर्थ होऊ.

शेवटी श्रीमानकडून आमची अपेक्षा आहे की आमच्या या निर्णयाचा कुप्रभाव सबधित अशिलाच्या कज्जावर होणार नाही आणि त्यांना आपल्या कज्जांची पैरवी करण्यासाठी आवश्यक सवलतीही मिळतील. आम्ही आमच्यातर्फे अशिलांना सूचना दिली आहे.

या घटनेने त्या दिवशी सारे न्यायालय विस्मित झाले होते. हैदराबादच्या इतिहासात ही घटना अत्यत अद्भुत होती. भारतीय असहकार आदोलनात जी गोष्ट शक्य झाली नाही ती हैदराबादेत यशस्वी झाली. राज्यातील विधिज्ञांनी न्यायालयावर यशस्वी बहिष्कार टाकून, आपल्या राष्ट्रात, एक नवा कीर्तिध्वज उभारला आहे.

मुख्य न्यायमूर्तींना निवेदन दिल्यानतर संबधित विधिज्ञांचा उत्साह द्विगुणित झाला. त्याच्यात नवचैतन्य स्फुरले. सर्वजण मिरवणुकीने, पायी चालत हायकोर्ट ते जामबाग (श्री. विनायकराव विद्यालकाराच्या निवासस्थानापर्यंत) आले. या मिरवणुकीत त्या दिवशी उच्च न्यायालयात उपस्थित असणारे अन्य लोकही सहभागी झाले. जवळजवळ पाच-सहाशे लोक मिरवणुकीत होते. एकूण दृश्य अभूतपूर्व होते. अपूर्व उत्साह ओसडत होता. मद्रासच्या बार-असोसिएशनने एका प्रस्तावाद्वारे हैदराबाद राज्यातील विधिज्ञांच्या या सहजपूर्ण निर्णयाचे स्वागत करून अभिनदन केले. आणि घवघवीत पाठिबाही व्यक्त केला. A. I. R. नेही बहिष्काराचे वृत्त प्रसारित केले. विधिज्ञांच्या या साहसपूर्ण निर्णयामुळे जगासमोर तथाकथित शात हैदराबादचे नग्न चित्र आले. या घटनेचे दूरगामी परिणाम झाले. विधिज्ञनिषेध समितीने (Pleaders Protest Committee) न्यायालयावर यशस्वी आणि प्रभावी बहिष्कार तर घातलाच शिवाय राज्यातील विनाशकारी घटनांची माहिती मिळविली, मजलिसच्या शातीकार्याची (!) पुराव्यासह नोद केली. भारत सरकारच्या आरोपांना या पुराव्यामुळे बळकटी आली. सरदार वल्लभभाईंनी या प्रकरणाची महत्ता जाणली, आणि म्हणूनच ते प्रसन्न होते, एरवी गभीर असलेल्या त्यांच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली होती. विधिज्ञांनी न्यायालयावर टाकलेल्या अभूतपूर्व बहिष्कार वार्तेने ते उत्तेजित, प्रभावित झाले होते.

(हैदराबाद राज्यातील विधिज्ञ निषेध समितीने केलेल्या असामान्य कार्याचा सविस्तर परिचय येत्या अकात देण्यात येईल)

☐ ☐


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये
सहामाही : वीस रुपये
परदेश : (जलमार्गे)
पंचावन रुपये

# महाराष्ट्र सरस्वतीच्या दरबारात : पृष्ठ ११ वरून

सोहोळचाचं उद्घाटन होतं. उद्घाटक वि. स. खांडेकर, स्वागताध्यक्ष रणजीत देसाई.

स्वामीकार रणजीत देसाई यांचे लेखी भाषण होते. नेहमीच्याच स्टायलीत ते बरंच काही अलंकारीक वगैरे बोलले. इचलकरंजीच्या ऐतिहासिक परंपरेचा त्यांनी गौरव केला. मानवी जीवनातल्या सुख दुःखाच्या धाग्यानीच कथा कादंबऱ्या नाटकांची वस्त्रं सजत असतात. ती वस्त्रं गुंफणारे कबीर–या भूमीला लाभले आहेत असं सांगून श्रीमान–योगी कारांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट मिळवला.

भाऊसाहेब खांडेकर कोल्हापूरचे. कोल्हापूर इचलकरंजीपासून फक्त सोळा मैलावर. इतक्या वृद्धापकाळीसुद्धा भाऊसाहेब उद्घाटनाला उपस्थित राहिले. इतकेच नव्हे तर त्यानी अतिशय चांगले विचारही मांडले.

जवळ जवळ पावतास केलेल्या आपल्या खणखणीत भाषणात भाऊसाहेब म्हणाले की, परिस्थितीप्रमाणे जीवन बदलत चालले. साहित्य सुद्धा बदलत चालले. जुन्या श्रद्धांवर आघात झाले. जुन्या श्रद्धा लयाला गेल्या पण त्याच बरोबर आता नव्या श्रद्धा निर्माण केल्या पाहिजेत. त्यामुळे साहित्यक आपले संकुचित जीवन सोडून विशाल बनतो, जगाशी समरस होतो. म्हणून श्रद्धा-जोपासली पाहिजे. त्यामुळे साहित्याला बळ चढते. एव्हाना सबंध सभामंडप गच्च भरून जवळ जवळ दोन हजार माणसं ताटकळत उभी असतात. पु. ल. अध्यक्षीय भाषण करायला उठतात.

पु. ल. नी आपलं छापील भाषण चक्क वाचून दाखवलं. पण ते कधीही कंटाळदाणं झालं नाही. आपल्या भाषणात पु. ल. नी अनेक विषयांचा परामर्ष घेतला. पण ते एकंदरीत गोल गोल बोलले. आपल्या भाषणामुळं फारशी कॉंट्राव्हर्सी निर्माण होणार नाही अशी दक्षता घेत ते बरंच काही आवेशपूर्ण बोलले. लेखन स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना, एकादी साहित्यकृती न आवडण्याचा आपल्याला हक्क आहे पण ती जाळून टाकण्याचा नव्हे, असं त्यांनी ठामपणे सांगितलं.

पु. ल. ललित साहित्यासंबंधी बरंच चांगलं बोलले. गेल्या संमेलनाचे अध्यक्ष ग. दि. माडगूळकर यांनी ' रसाळ नामदेवांचा काळ जाऊन ढसाळ नामदेवांचा काळ आला. ' असं काव्यात्मक वाक्य बोलून बरेच शत्रू कमावले. पु. ल. नी थेट उलटं केलं. नामदेव ढसाळ पासून बाबूराव बागूल पर्यंत या तमाम लेखक मंडळींचा नावानिशी उल्लेख करून पु. ल. नी त्यांचा उदो उदो केला-नामदेवची एक कविता उधृत केली. एकूण आपल्या पहिल्याच भाषणात पु. ल. नी सभा जिंकली. त्यांच्या जवळ जवळ पाऊण तासाच्या भाषणात टाळ्यांचे अनेक कडकडाट आणि हास्यांचे शेकडो फवारे चित्रवाणीच्या कॅमेऱ्यानं टिपले. पु. ल. नी अधिवेशनावर इथंपासूनच जो ताबा मिळविला तो शेवटच्या सामारोपाच्या भाषणापर्यंत. या तीन दिवसांच्याकाळांत त्यांनी किमान पंधरा वीस भाषणं केली आणि प्रत्येक भाषण प्रेक्षकांनी उचलून धरलं.

२७ डिसेंबर. अधिवेशनाचा दुसरा दिवस. सकाळीच अधिवेशनातला सर्वात महत्वाचा परिसंवाद 'ललित साहित्य आणि सामाजिक जाणिवा ' पार पडला. गांभीर्यपूर्वक चर्चा होऊन विचार प्रवर्तक भाषणं झालेला अधिवेशनातला हा एकमेव कार्यक्रम. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परिसंवादाच्या अध्यक्षपदी होते. या परिसंवादात प्राध्यापक मंडळींनी भाग घेतल्यानं तो थोडासा बोजडही झाला.

औरंगाबादचे प्रा. पांतवणे यांनी प्रथम जुन्या ललित साहित्यावर हल्ला केला. आजपर्यंतची साहित्यकृती सामाजिक संबंध टाळण्याचा प्रयत्न करीत होती असा आरोप करून पांतवणे म्हणाले की, नव्या साहित्यिकांच्या विचारातलं वेगळेपण मान्य करण्याची गरज निर्माण झाली आहे. या जाणिवेला ललितकृती म्हटलं तर वावगं ठरू नये.


मुंबईच्या प्राध्यापिका सरोजिनी वैद्य यानी अस्सल प्राध्यापकी भाषण केले. आपल्या संथ लयीतल्या स्पष्ट भाषणात त्यांनी नव्या साहित्यिकांना खरपूस चोप दिला. अनुभव कडक आणि भडक रीतीनं व्यक्त करण्यानं रचनाच परिणामशून्य होते. साहित्यिकाना आलेले अनुभव युनिक असतील पण त्यातली असत्यता आणि दुहेरीपणाची भावना मात्र अयोग्य वाटते. वाङ्मयात त्यांचे प्रयोजन काय ? साहित्यातलं भावविश्व कलात्मकतेनं प्रकट व्हायला हवं, असे ठसठशीत आणि जळजळीत विचार सरोजिनीबाईंनी मांडले.

अंतर्मुख होणारा कोणताही कलावंत सामाजिक जाणिवांपासून अलिप्त राहूच शकत नाही असं कोल्हापूरचे प्राध्यापक नासिराबादकर म्हणाले. ' शिवे' हा प्रामाणिक जीवनाचा आविष्कार आहे. ' असं टाळ्यांचं वाक्यही त्यांनी टाकलं. प्रख्यात गुजराती लेखक गुलाबदास ब्रोकर यांचंही यावेळी गुजरातीतून भाषण झालं.

यासर्व वक्त्यांच्या मानाने तर्कतीर्थांचं भाषण फारच मुळमुळीत झालं. शिव आणि शिवीच्या संबंध लावून त्यातून विनोद निर्माण करण्याच्या प्रयत्नात विषयाचं गांभिर्यच ते हरवून बसले.

यानंतर झालेला ' स्त्री आणि विनोद ' हा परिसंवाद विषयाइतकाच भोंगळ आणि सवंग झाला. मुंबईच्या लालबागमधल्या सार्वजनिक गणेशोत्सवात शोभेल असा हा विषय साहित्य सम्मेलनांत चर्चिण्यामध्ये संयोजकांनी काय साधलं ते तेच जाणोत. असो.

नंतर माजी समेलनाध्यक्ष तसंच अन्य भाषिक साहित्यिकांचा



सत्कार सोहळा पार पडला. माजी अध्यक्षांच्या वतीनं म. म. दत्तो वामन पोतदार बोलले. मराठी भाषा राज्यभाषा केल्याचा नुसता कायदा करून चालणार नाही, त्याकरता साहित्याची सारी शक्ती एकवटावी लागेल असं ते म्हणाले.

परप्रांतीय साहित्यिक यावेळी आपापल्या भाषांत बोलले. ही कल्पना चांगली आहे. पण भाषणं ही लोकाना कळण्यासाठी असतात असा माझा समज आहे. त्याकरता दुभाषाचा उपयोग केला गेला असता तर ही कल्पना उपयोगी ठरली असती.

२८ डिसेंबर अधिवेशनाचा तिसरा आणि शेवटचा दिवस. या दिवशी सकाळीच तीन गटवार चर्चा एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी पार पडल्या. यापैकी पहिली ज्ञानेश्वरीच्या तत्त्वज्ञानासंबंधी, दुसरी प्रकाशकाच्या डोक्यासंबंधी आणि तिसरी दलित साहित्यासंबंधी होती. या तिन्ही चर्चांमध्ये प्रेक्षकानी फारसा उत्साह दाखवला नाही. चर्चाही रटाळच झाल्याचं समजतं.

ऐन भोजनाच्या वेळी कथा कथनाचा कार्यक्रम आयोजण्यात आला होता. व. पु काळे, व्यंकटेश माडगूळकर, गंगाधर गाडगीळ, पु. ल. देशपांडे यासारखे अतीरथी महारथी कथाकथनाच्या रिंगणात होते. संबंध अधिवेशनात प्रेक्षकाना सर्वात जास्त आवडलेला हा कार्यक्रम. अधिवेशनात एकूण दोन कवीसमेलन पार पडली. दोन्हीमधले कवी जवळजवळ सारखेच. बऱ्याचशा कविता रटाळ आणि फालतू मासिकात छापून येण्याच्या लायकीच्या. त्यातल्या त्यात अनिल, न. धो. महानोर, मंगेश पाडगावकर, इंदिरा संत, वसंत बापट, पद्मा गोळे यांच्या कविता दाद घेऊन गेल्या. पण एकूण कवीसमेलन सवंगच.

शेवटी खुलं अधिवेशन. यात नऊ ठरावाचं वाचन होऊन ते संमत झाले. बेळगाव आणि अन्य राज्यात असणारे सलग मराठी भाषिक प्रदेश यांचं महाराष्ट्रात विलिनीकरण करण्यासंबंधीचा, तसच मराठी भाषेची गळचेपी करणाऱ्या कर्नाटक सरकारचा निषेध करणारा ठराव विशेष गाजला. गेली अनेक वर्षं असे ठराव वेगवेगळ्या पातळ्यावर असेच जोशात होत आहेत. त्याच्या प्रती जिल्हाधिकाऱ्यापासून ते थेट राष्ट्रपतीपर्यंत जाताहेत. तरीही प्रश्न कायमच आहे; आणखी ठराव होण्यासाठी. तर असो.

शेवटी पु. ल. च्या गोड गोड भाषणानं तीन दिवसाचं, साडेचारशे प्रतिनिधीच हे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन संपलं. या अधिवेशनानं काय साधलं. तर पु. लं. च्याच भाषेत इतका मराठी रसिक एक झाला. तीन दिवस गुण्यागोविंदानं नांदला. पण या शब्दाच्या फैरीखेरीज या अधिवेशनाचं निष्पन्न काय ?

ललित साहित्याच्या सामाजिक जाणिवांबद्दल बोलत असताना ही साहित्यिक मंडळी वर्तमानकाळ पूर्णपणे विसरली. लोकसभेत गाजलेल्या परवाना प्रकरणाची कुणालाच याद आली नाही किंवा भरमसाठ वाढणाऱ्या भावामुळे आणि दिवसेदिवस तीव्र होत जाणाऱ्या कृत्रिम टचाईमुळ भररस्त्यावर उपाशीपोटी पडलेल्याचं स्मरण कुणालाच झालं नाही. इचलकरंजीकराचा अगत्याचा पाहुणचार स्वीकारताना आणि जिलेबी–श्रीखंडाचं जेवण चापताना बिहार उत्तर प्रदेशातल्या थंडीनं मरणाऱ्या गरिबांकरता निधी जमवण्याची जाणीव कुणालाच नव्हती. 'साहित्यिक ही हाडामासाची माणसच आहेत. ते समाजाचे घटकच आहेत,' असं ठामपणे सांगताना 'आम्ही सुशिक्षित' म्हणवणारे हे साहित्यिक इतक्या सामान्य जाणिवा कसे विसरले ?

आज सारा बिहार भ्रष्टाचाराविरुद्धच्या आंदोलनान पेटलाय. एका बाजूला पैसा आणि सत्तेच्या मदानं मत्त आणि मस्त झालेली प्रचंड शक्ती आणि दुसऱ्या बाजूला संतापान पेटलेली पण अगतिक दरिद्री जनता असा निकराचा सामना चालू आहे. साऱ्या देशाचं भवितव्य या सामन्याच्या निर्णयात गुंतलं आहे हा लढा सामाजिकच पण त्याची जाणीव या परिषदेला बिलकूल दिसली नाही. जयप्रकाशाच्या या चळवळीला पाठिंबा देण्याचा बोटभर ठराव परिषदेत येऊ शकला नाही, याला काय म्हणावं ?

मराठी रसिक एकत्र आणणं आणि मान्यवर साहित्यिक एका व्यासपीठावर बसवणं हेच जर अशा संमेलनाचं उद्दिष्ट असेल तर त्याकरता इतका डांगोरा पिटण्याचं कारण काय ?

असो. तर काय पन्नासावं साहित्य संमेलन पार पडलं. असंच एकोणपन्नासावं संमेलन झालं होतं. यानंतर एक्कावन्नावं. त्यानंतर बावन्नावं संमेलनसुद्धा असंच पार पडेल. संमेलनाध्यक्ष लांबलचक, गोल गोल आणि गोड गोड, थोडीशी कडक आणि बरीचशी सपक भाषणं करतील, सामाजिक जाणिवा वगैरेसारखे परिसंवाद होतील. मराठी रसिक एकत्र जमेल, टाळ्या वाजवील, हास्याचे फवारे उडतील, त्याचं चित्रीकरण करून चित्रवाणी खास कार्यक्रम सादर करील. बिहारमधलं आंदोलन भडकतच राहील. □ □


# श्रीग्रामायन

मूल्य
पंधरा रुपये

लेखक
श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०

# इंदिराजींचा हा विजय आहे ! तितकाच विरोधकांचा पराभव आहे.

इंदिराजी परवा मुंबईला येऊन गेल्या. 'इंटक'च्या अधिवेशनाच्या निमित्ताने. त्याच दिवशी म्हणे कांग्रेसचा वर्धापन-दिन होता. यदा अनायसे इंदिराजी मुंबईला आल्या म्हणून की काय कोण जाणे, गेल्या कित्येक वर्षात (निदान माझ्यातरी) कानावर न पडलेल्या ह्या कांग्रेस वर्धापन–दिनाचे सूपही ह्याच दिवशी वाजवून घेतले गेले. इंटकचा शिवाजी–पार्कवरील कामगार (??) मेळावा कांग्रेस वर्धापन दिनाचे सूप आणि चेंबर ऑफ कॉमर्समधील व्यापाऱ्या-समोरचे 'मवाळ' भाषण हे इंदिराजींचे प्रमुख लौकिक कार्यक्रम ह्या दिवशी झाले. अर्थातच सर्वच दृष्टींनी महत्त्वाचा होता तो 'इंटक' सोहळयाचा शिवाजी पार्कवरील कार्यक्रम. इंदिराजी कामगारांचे जिव्हाळयाचे प्रश्न हाताळतील अशी अपेक्षा होती. अलीकडच्या पगार कपातीला कामगाराचा फार मोठा विरोध आहे. इंटकचा देखील. वाढती महागाई, बेरोजगारी हेही प्रश्न कामगारांना भेडसावीत आहेत. कामगार आणि सामान्य जनता ह्या सर्वच प्रश्नांनी त्रस्त आहे. साहजिकच अपेक्षा अशी होती, की इंदिराजी ह्या साऱ्या प्रश्नावर बोलतील. काही तोडगा सुचवतील. कामगारांना होत असलेल्या जखमांवर फुंकर घालतील. परंतु पंतप्रधानांनी ह्यापैकी काहीही केले नाही. कामगार हे बिनीचे शिपाई असल्याचा पुकार करून त्यांना भुकेल्या पोटी उत्पादन वाढीचा एक डोस त्यांनी पाजला, कामगाराच्या प्रश्नांना त्यांनी स्पर्श केला तो एवढाच ! बाकीचा संपूर्ण वेळ त्यांनी विरोधी पक्षांवर तोफा डागण्यातच घालवला ! जणू त्या कांग्रेसच्या प्रचार–सभेतच भाषण करीत होत्या !!

ह्या सभेत बिहार आंदोलनाचा तसा उल्लेख होण्याची काही खास गरज होती असे मला वाटत नाही. परंतु सध्या त्यांना जळी-स्थळी-काळी बिहार आंदोलनच दिसत असावे असे वाटते. ह्या आंदोलनाला जिथे वाव मिळेल तिथे त्या झोडपून काढायचा प्रयत्न करीत असतात. इंटक सोहळयानंतर लगेचच हरियानात शेतकरी मेळाव्यात बोलतानाही शेतकऱ्याच्या प्रश्नाऐवजी श्रीमती गांधींनी बिहार आंदोलन व अन्य भ्रष्टाचार विरोधी आंदोलनांवरच भर दिला. दोन्ही ठिकाणी त्यांनी कारण नसताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ व आनंदमार्गीयांवर ताशेरे झाडले. जयप्रकाशांची नैतिक शक्ती पाठीशी नसती तर ह्या संघटना स्वतःच्या बळावर काही करू शकल्या असत्या असे मला तरी वाटत नाही. शिवाय समाजवादी मंडळींना फार मोठ्या प्रमाणावर हे आंदोलन उचलून धरले आहे. पुढे रेटले आहे. तेव्हा संघ–जनसंघाला पुढे करून उगाचच भुई धोपटण्याने काही साधेल असे वाटत नाही. मूळ प्रश्न बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा आहे. त्याविरुद्ध संघ-जनसंघ जर आवाज उठवीत असतील तर त्यात चूक काहीच नाही. उलट त्यांच्या दृष्टीने ती जमेची बाजू आहे. इंदिराजींच्या म्हणण्यानुसार ह्या संघटनाच आंदोलनाच्या पाठीशी आहेत असे गृहीत धरले तर, इंदिराजीकृत ह्या संघटनांना मिळलेले ते प्रशस्तिपत्रच आहे असे मी मानीन ! परंतु प्रत्यक्षात परिस्थिती तशी नाही. भस्मासुरी महागाई, काळाबाजार, भ्रष्टाचार ह्यामुळे लोक मनातून पेटलेले होतेच. ह्या असंतोषाला वाचा फुटली जयप्रकाशांच्या सर्वंकष नैतिक पाठिंब्यामुळे आंदोलन ह्यातून उभे राहिले. ही वस्तुस्थिती लक्षात न घेता, सद्य:स्थितीवर योग्य उपाय न योजता विरोधी पक्षियावर वेळी अवेळी आसूड उगारून काही साधेलसे वाटत नाही.

एखादा कामगार मेळावा किंवा शेतकरी मेळावा तरी निदान अशा टीकेपासून अलिप्त ठेवला जायला हवा होता. परंतु हे घडले नाही. कामगार मेळाव्यासमोर, कामगार–प्रश्न कळत–न–कळत पद्धतीने हाताळले गेले. महत्त्वाचा भर दिला गेला तो बिहार आंदोलनावर नवीन झोड उठविण्यावर. इंदिराजींच्या ह्या भाषणा-तही नवीन असे काही नव्हते. उत्साहवर्धक वगैरे काही असण्याची तर बातच सोडा ! 'इंटक–सोहळा' कार्यक्रमात खास असे काही नव्हते. कामगारांचा उत्स्फूर्त मेळावाही तो होता असे मी मानायला तयार नाही. माझ्या माहितीनुसार 'जमवून' आणलेला तो मेळावा होता. कामगारापेक्षा मेळाव्याला हजर राहून दोन चार दिवसाचा पोटा–पाण्याचा प्रश्न सुटेल तर पहावे म्हणून जमलेल्याचा तो मेळावा होता. दादर फलाटावर 'इंटक'ने जे स्वागत टेबल मांडले होते त्याच्याजवळ अर्धा पाऊण तास उभे राहून देखील ही वस्तुस्थिती लक्षात येऊ शकत होती. दादर स्टेशनवर किंवा शिवाजी पार्कवर सेंच्युरी, इंदू, मोरारजी वगैरे मिल्सच्या गाड्या उभ्या असत. बहुधा शिवाजी पार्कवर जमणाऱ्या मेळाव्यात 'कामगार'(?) नेऊन ओतण्यासाठी. ह्या गाड्यांचा खर्च ह्या मिल्सनी दिला की 'इंटक'ने हे कधीच कळणार नाही. बहुधा कुठल्या तरी 'वरकमाई'तून तो जुळवला गेला असण्याचीही शक्यता आहे....

मेळाव्याच्या निमित्ताने निदर्शने मोठाली होणार अशा बातम्या होत्या. विविध कामगार संघटनांनी तसा चंग बांधला होता. 'इंदिराजी आयी है, अंधेरा लायी है'चे प्रतीक म्हणून त्या दिवशी

ब्लॅक आऊट करणाऱ्या घोषणा संप सम्राटांनी केल्या होत्या. निदर्शनांची डरकाळी वाघानीही फोडली होती. परतु प्रत्यक्षात, श्रीमती मृणाल गोरे ह्यांच्या नेतृत्वाखाली महिलाचीच काय ती प्रभावी निदर्शने झाली. 'सारी नारी आयेगी, इदिरा सरकार भागेगी' हा त्याचा आवेश होता. त्याचे निदर्शनात फक्त थोडीशी जान होती. ब्रेबॉर्नवरील कार्यक्रमातही थोडीशी निदर्शने केली ती महिलानीच. इतर सार कस शात शात होत. श्रीमती मृणाल गोरेंच्या महिला आघाडी व्यतिरिक्त, इतर कुणाला सद्य:स्थितीची झळ जणू पोचतच नव्हती. निदर्शनाचा आखलेला किंवा सुरुवातीला घोषित केला गेलेला कार्यक्रम हा जनतेच्या भावना केवळ प्रदर्शित करण्यासाठीच होता. जनतेच्या भावना आजही प्रखर आहेत. महागाई, दुर्भिक्षता ह्यामुळे आजही जनता त्रस्त आहे. त्यातच पगार गोठवले जात आहेत. निम्मा बोनस सरकार दफ्तरी जमा होत आहे. ह्यामुळे जनतेच्या अडचणी वृद्धिंगतच होत आहेत. ह्या अडचणी, ह्या भावना प्रभावीपणे व्यक्त होणे आवश्यकच होते. व ती जबाबदारी विरोधी पक्षाचीच होती. विरोधी पक्ष ती व्यवस्थितपणे पार पाडू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. जनता सर्वसामान्यपणे सध्याच्या प्रशासनाला, सरकारला विटली आहे. महाराष्ट्रातल्या ताज्या नगरपालिका निवडणुकांनी तो कौल स्पष्टपणे दिला आहे. पण अस असूनही, महाराष्ट्राच्या राजधानीत आधी ढोल बडवूनही प्रभावी निदर्शने सघटित करणे विरोधी पक्षाना साधल नाही. विरोधकाची ही दारुण शोकातिका आहे! *वाघाच्या डरकाळ्या खोट्याच ठरल्या.* उलट खाली मान घालून नखानी माती उकरीत वाघोबाच इदिराजीच्या स्वागताला गेले. विशेषत: जयप्रकाशांना सपूर्ण पाठिंबा सेनापतीनी व्यक्त केल्यानतर हे घडल आहे!! हा विरोधाभास लक्षात घेतल्यावर ठाकरे-इदिराजी भेट सरळ साधी नव्हती असा कयास काढायला हरकत नाही! शिवसेनेबरोबरच कम्युनिस्ट्स्, लीग, बोहरा जमातीचे नेते, ख्रिस्ती समाजाचे नेते वगैरेंनीही इदिराजीची भेट घेतल्याचे वृत्त आहे. ह्या सर्वांशी झालेले गुफ्तगू आणि शिवसेनेप्रमाणेच सघ, समाजवादी आदी मडळीनी ह्या भेटप्रसगी घेतलेली अनपेक्षित माघार. ह्यामुळे इदिराजी आपल्या मुबई-भेटीत विरोधकावर मात करून गेल्या आहेत. विशेष काही दिव्य-भव्य न करताही, जनतेच्या हालअपेष्टांवर कुठलाही उतारा न देताही!! इदिराजीचा हा विजय आहे! तितकाच तो विरोधकाचा पराभव आहे!! जयप्रकाश आदोलनाच्या पार्श्वभूमिवर, जनता साधारणत. सरकारच्या विरोधात असतानाही विरोधकाना, निदान मुबईत तरी हा पराभव पत्करावा लागला हा खरा दैवदुर्विलास– विरोधी पक्षाचा नव्हे तर त्यांच्या नामुश्कीतून पोरक्या झालेल्या विरोधी विचार सरणीच्या जनतेचा!!

अशा अवस्थेत, नजीकच्या काळात मध्यावधी निवडणुका झाल्या तर, विरोधक जयप्रकाशाच्या भूमिकेवर एकत्र येऊन सरकारविरोधी जनतेच्या भावनाचे खरेखुरे प्रतिनिधित्व कितपत करतील ही शकाच आहे! जनता उमेदवार उभे केले तर ते कॉंग्रेसला हादरवू शकतात, हे ताज्या भोपाळ व दिल्लीतल्या पोटनिवडणुकानी सिद्ध केले आहे. पण देशाच्या वा एखाद्या राज्याच्याही भदर्भात हे शक्य होईल असे सध्या चालू असलेल्या चर्वितचर्वणावरून वाटत नाही. ते शक्य व्हायचे असेल तर स्वार्थी पक्षीय राजकारण करणाऱ्या सध्याच्या दुड्ढाचारी राजकारण्यानी दूर झाले पाहिजे. पक्षाना मूठमाती दिली पाहिजे. व जयप्रकाशाचे नेतृत्व प्रमाण *मानून एखादा एकमेव सर्वंकश राष्ट्रीय पक्ष नव्या उमेदीने उभा* राहिला पाहिजे. अशा पक्षातच कॉंग्रेसशी टक्कर घेण्याचे सामर्थ्य असेल, तसेच सर्वंकश परिवर्तनाला सहर्ष सामोरे जाण्याची ताकद असेल! हे घडत नाही तोवर खुज्या, चिल्लर पक्षानी सर्वांगीण क्रांतीच्या गप्पा मारणे व्यर्थ आहे!

—बंडू ठाणेकर

---

## बांगला देश

पृष्ठ ९ वरून

अनेक गट आहेत. शेख मुजीब याच्या धोरणाना हे गट बाह्यत: पाठिंबा दर्शवीत असले तरी आतून त्याच्या एकमेकाविरुद्ध हालचाली चालू असतात.

सध्याच्या ससदीय लोकशाहीचे ऐवजी अध्यक्षीय लोकशाही आणून अधिक कार्यक्षम कारभार आपणास करता येईल असे गेले काही महिने मुजीब यांना वाटत आहे. गेल्या जुलैमध्ये त्यानी ही सूचना प्रथम माडली. अवामी लीगच्या नोव्हेंबरमधील बैठकीत त्यावर विचार झाला पण कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. कारण अवामी लीगच्या बऱ्याच कार्यकर्त्यांनी या बदलास विरोध दर्शविला. त्यामुळे मुजीब आपल्या सूचनेचा फेरविचार करीत असून जानेवारीच्या मध्यास पार्लमेंटची बैठक सुरू होण्यापूर्वी ते यासबधी निर्णय घेतील.

अध्यक्षीय लोकशाही आणि ससदीय लोकशाही या दोन्ही पद्धतीचा तुलनात्मक विचार करूनच बागला देशाच्या घटनाकारानी ससदीय लोकशाही स्वीकारली. मग एवढ्यातच ती बदलावी असे मुजीबना का वाटू लागले? अध्यक्षीय पद्धतीत अध्यक्षांच्या हाती बरीच सत्ता केंद्रित झालेली असते त्याचा फायदा घेऊन अधिक कार्यक्षमतेने कारभार आपण करू असे मुजीब यांना वाटत असावे. पण दोन्ही पद्धतीचे यशापयश मूलत त्या पद्धतीपेक्षा ती राबविणाऱ्या नेत्याच्या कर्तृत्वावर आणि कार्यक्षमतेवर अवलबून असते. अध्यक्षीय पद्धतीतून आयूबखानासारखे हुकूमशहा निर्माण होऊ शकतात. हा अनुभव पूर्वी आलेला आहे, तर ससदीय लोकशाहीचे अपयश भारतात दिसून येत आहे सरकारचा कार्यक्रम निष्ठेने अमलात आणणाऱ्या कार्यक्षम नोकरशाहीचा अभाव हा बागला देशापुढील आजचा खरा प्रश्न आहे. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ४–१–७५ ते १०–१–७५

### भारतात मध्यावधी निवडणुकीचे वेध

भारताच्या व इंदिरा गांधींच्या राशीवर रवी हा राजकारणी समर्थ ग्रह आला आहे. ही घटना काँग्रेस पक्ष, स्वत पतप्रधान, विरोधी पक्ष या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. काही बाबतीत प्रतिष्ठा वाढेल पण देशात असतोष, राजकीय धामधूम, आरोप प्रत्यारोप यांनी खळबळ माजेल. मध्यावधी निवडणुकीचे वारे जोराने वाहू लागणार आहेत. इंदिराजी विरोधकावर जोरदार तोफा डागू लागणार आहेत व निवडणुकीची पावलेदेखील त्या गुप्तपणे उचलू लागणार आहेत. ललितनारायण मिश्राच्या दुर्दैवी मृत्यूचे भांडवल सत्ताधारी पक्षाला उपकारक ठरले तर आश्चर्य नको महाराष्ट्रात अकल्पित घटना.

### मेष : औद्योगिक प्रगती

चौदा जानेवारीला मकर राशीत घडणारे रवी या ग्रहाचे मकर सक्रमण ही एकच गोष्ट तुमच्या आगामी अद्वितीय यशाची, विजयाची व प्रगतीची खात्री द्यायला पुरेशी आहे. रविवार हा दिवस अत्यत शुभदायक आहे. कोणत्याही नव्या कार्याची, नव्या उद्योगाची, नव्या नोकरीच्या शोधाची आणि नोकरीत अपेक्षित मागण्याची मुहूर्तमेढ रोवायला उत्तम आहे. आता तब्येतीची सबब सांगू नका. पैशाच्या अडचणीचा बाऊ नको. एखाद्या व्यक्तीबद्दल मनात गैरसमज ठेवू नका. वरिष्ठाकडे मोकळ्या मनाने जा व तुमचे मनोगत व्यक्त करा. विज्ञान व वाणिज्य पदवीधरानी सरकारी नोकरीत प्रयत्न करावेत किंवा इंजिनियरिंग उद्योगात जावे. यश हाती येईल. विवाह ठरतील व पारही पडतील. मन उत्साही राहील. पैशाचा पेच बुधवारपर्यंत सुटेल. विद्यार्थ्यांनी परीक्षेत मन लावून पेपर लिहावेत. महिलांना नोकरीत जपून राहावे लागेल. उघु उद्योग करावा. शुभराशी २–४–१०.

### वृषभ : प्रवासाला उपकारक

या आठवड्यात घडणारे मकर सक्रमण तुमच्या भाग्यस्थानी घडत आहे ही असामान्य अशीच घटना आहे. शिवाय मगळाचे वरदान लाभणार आहे हीदेखील दुधात साखर होय. नोकरी अगर धंद्याच्या कामासाठी परदेशच्या–दूरच्या प्रवासाची तुमची फार दिवसाची इच्छा होती. ती इच्छा आता पुरी होईल. स्थावराच्या मिळकतीसबधी काही मागणे असेल, न्यायनिवाड्यासाठी कोर्टकचेरी करावयाची असेल तर सोमवार ते शुक्रवार या मुदतीत करा. चालू नोकरीतच लक्ष घाला. मालक अगर वरिष्ठांना तुमची बाजू पटवून द्या. तुमच्या मागणीचा सहानुभूतीने विचार होईल. नोकरीसाठी कला–पदवीधराना शुभ काळ आहे. खताचा अगर उंची कापडाचा, सोनेचांदीचा व्यवहार त्यातल्या त्यात फायदेशीर होईल. या आठवड्यात नवी कोणतीच वस्तू खरेदी करू नका. फसवणूक होईल. पैशाची बाजू भक्कम राहील. तरुणतरुणींना जवळची सहल घडेल. स्वप्ने पुरी होतील. महिलांना अचानक अर्थप्राप्ती. नोकरीत प्रमोशन. शुभ राशी १–७–९.

### मिथुन : बेदरकारपणा नको

या आठवड्यात तुम्हाला रवी आणि मगळ हे दोन्ही समर्थ ग्रह अनुकूल नाहीत. रवी तर आठवा झाला आहे. तुमची रास बौद्धिक श्रेष्ठतेची रास आहे. त्यामुळे अतिरिक्त वाचन, सतत विचार याच्या आहारी जाऊ नका. नोकरीत तसा त्रास नाही. पण रविवार ते बुधवार या दरम्यान मालक अगर वरिष्ठ व्यक्ती यांच्याकडून अपमान होण्याची शक्यता आहे. मात्र असा अपमान फारसा गभीरपणे घेऊ नका. कारण त्यामुळे तुमचे कोणतेच नुकसान होणार नाही. तुम्ही जेथे नोकरी करता तेथे खळबळीचे वातावरण निर्माण होणार आहे. त्यामुळे तुमचे मन भीतिग्रस्त राहील. पण प्रत्यक्ष असे काहीच घडणार नाही. रक्तदाब, पित्त यासारखे विकार उचल खातील. थोडा त्रास होईल. पण काळजी करू नये. विद्यार्थी व तरुणतरुणीनी मोहाच्या जाळ्यात अडकणार नाही याची काळजी घ्यावी. महिलाना ससारात अडचणी आल्या तरी त्या दूर होतील. शुभराशी ९–१०–१२.

### कर्क : संयमाची गरज

शनीच्या साडेसातीचे आता शेवटचे पर्व सुरू झाले आहे. त्याचप्रमाणे त्याची उग्रतादेखील कमी होऊ लागली आहे. आठव्या गुरूची कारकीर्दही फारच थोडी राहिली असून तुमच्या भाग्याला वसत बहर आणण्यासाठी तो भाग्यस्थानी स्वगृही येणार आहे. तो बदलताना तुमचे स्थावराचे व आर्थिक समृद्धीचे काम यावेळी होणार आहे. स्थावरात पत्नीकडून काही तरी मिळण्याची शक्यता आहे. तुम्ही रेस, लॉटरीत भाग घेत असाल तर यावेळी तुम्हाला लाभ होऊ शकेल. प्रामुख्याने रवी–मगळ हे ग्रह तेवढेसे ठीक नसल्यामुळे तुम्ही मनावर ताबा ठेवण्याची, सयमाने वागण्याची आवश्यकता आहे. तुमची तब्येत अशक्त असेल तर थडीचा तुम्हाला त्रास होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्या. रक्तदाब, दमा यापासून ज्याना त्रास होतो त्यानी वाहन चालवताना फार काळजी घ्यावी. सोमवार व गुरुवार नोकरीतील काही कामे होऊ शकतील. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी भावनेच्या आहारी जाऊ नये. विवाहेच्छूनी विवाहाचा बेतदेखील पुढे ढकलावा. महिलानी भांडणापासून दूर राहावे. ससारात लक्ष घालावे. शुभराशी ३–८–१०.

### सिंह : आशाआकांक्षाना वाव

याच आठवड्यात रवी सहावा होत आहे ही एकच गोष्ट तुमचा आशावाद प्रदीप्त करणारी ठरावी. सिंह–व्यक्ती कर्तृत्वाला कमी पडत नाहीत. पण अपयश त्याना सहन होत नाही. तसेच त्याच्या यशाचा हेवा करणारी, मत्सर करणारी माणसेदेखील त्याच्या सतत आसपास असतात. तुम्ही मुळातच राजकारणी पिंडाचे असल्यामुळे तुम्हाला शत्रू–विरोधक फार असतात. यावेळी अशा लोकाना तुम्ही नामोहरम करू शकाल. निवडणुकीत तुम्ही

जर भाग घेत असाल तर तुमच्या स्पर्धकाला पराभव पत्करावा लागेल. परीक्षेत अनेकांना मागे सारून तुम्ही नेत्रदीपक यश पदरात पाडून घेऊ शकाल. नोकरीत आशा-आकांक्षांना उपकारक असे क्षेत्र व वाव तुम्हाला मिळणार आहे. पदवीधर असो वा शिक्षित असो तुमच्यापैकी अनेकाना उद्योग व्यवसाय मिळू शकेल. व्यापारात मात्र पडू नये. पोटदुखी, गॅसेसचा त्रास असणाऱ्यानी उष्ण पदार्थ जास्त सेवन करू नयेत. विवाहाच्या व्यक्तींना संशोधनात यश लाभेल. महिलांना सेवाकार्यात गौरवाचे प्रशस्तीपत्र मिळेल. शुभराशी ४–७–११.

### कन्या : संकल्पसिद्धीचा योग

तुम्ही व्यक्ती व्यवहारापेक्षा कल्पना-साम्राज्यात भराऱ्या मारीत असता. तुमच्या खिशात निरनिराळ्या नव्या नव्या योजनाची भेंडोळी असतात आणि मनात कल्पनांचे जाळे सतत विणले जात असते. हा उद्योग सहसा यशस्वी होत नाही. कारण सेवा हेच शेवटी तुमचे साधन असते. पण मित्र हो, नव्या वर्षातील या पहिल्याच महिन्यात तुमच्या सकल्पांना अनुकूल साथ मिळणार आहे. नोकरीत काही नाविन्यपूर्ण व आश्चर्य-कारक असे घडेल. वरिष्ठांकडे अनेक वर्षे धूळ खात पडलेली एखादी मागणी आजवर पुरी होत नव्हती. पण तिचा यावेळी सहानु-भूतीने विचार होईल. नोकरीत तुम्हाला उत्साह वाटेल व एकदर वातावरणदेखील उत्साहाचे राहील. लेखन, मनन, चिंतन यात होणारा अडथळा दूर होईल. दुय्यम व्यव-सायाला गती मिळेल. तुम्हाला करावी लागणारी लोकाची कामे मार्गी लागतील. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होऊ लागेल. आगामी गुरूचे भ्रमण अनेक कार्याना गती देणारे व अनुकूल ठरावे. महिलाना त्रास-दायक दिवस उरलेले नाहीत. आस्थेने काम करावे. शुभराशी ३–७–११.

### तूळ : व्यावसायिक प्रगती

रवी सुखस्थानात येत आहे हे तेवढेसे उपयुक्त नसले तरी मगळ मात्र तुमचे काही तरी कल्याण करण्यासाठी, भले करण्यासाठी उत्सुक आहे. आता मनातील शका–कुशंका काढून टाका व व्यावसायिक योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी कंबर कसून कामाला लागा. तुमची सध्या कोंडी झाली आहे. पण पाचवा गुरू लवकरच आपले स्थान सोडणार असल्यामुळे तो ते स्थान सोडताना तुम्हाला मोठे यश देऊन जाणार आहे. नोकरीतील उपेक्षा सपून तुमच्या मनासारखे घडू लागेल. कामाचा ताण कमी होऊन सुख लाभेल. रवी मन.स्थिती बिघडवणार आहे. पण त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. पैसा तुम्हाला कमी पडणार नाही. तुमच्या व्यव-सायासाठी हवी असलेली मदत तुम्हाला मिळू शकेल. अवतीभोवती निर्माण होऊ घातलेली अडचणीची स्थिती सोमवारपासून निवळू लागेल. रविवार–गुरुवार शुभदायक ठरतील. महिलाना मगल कार्यात पुढाकार लाभेल. शुभराशी ३–६–८.

### वृश्चिक : कुटुबात तंटा

बारावा हर्शल असूनदेखील तुम्हाला तसा काही फारसा त्रास झालेला नाही. पण मगळ तुमचा राशीस्वामी असूनदेखील कुटुबात अडचणी निर्माण होतील. भावा-भावात मिळकतीवरून काही तटे माजण्याची शक्यता नाकारू नका. दृष्टिआड करू नका व बेसावध राहू नका. एखादा जुना तटा पुन्हा नव्याने उद्भवू शकेल. तुम्ही यावेळी थोडे सयमाने वागायला हवे. हा त्रास सोडला तर आठवडा तसा प्रतिकूल नाही. नोकरीधद्याची स्थिती समाधानकारक राहील. बदलीची ऑर्डर निघाली तरी ती रद्द होईल. तुमच्या मनाप्रमाणे घडेल. जवळपासचा प्रवास दुसऱ्याच्या खर्चाने होईल चागले मित्र मदत करायला पुढे येतील. सोमवार व बुधवार हे दोन दिवस सोडले तर आठवडा तसा वाईट नाही. तरुण-तरुणीनी प्रेमात उगाच 'रेंगाळत' राहू नये. महिलांना उद्योगधद्यात नवे काही तरी करता येईल. शुभराशी ५–६–१०.

### धनू : वनवास संपला

राहू बरेच दिवस तुम्हाला अनिष्ट आहेच. त्याखेरीज मगळदेखील तुम्हाला छळीत होता. पण मित्र हो, रवी दुसरा होत आहे व मगळही तुमच्या सहाय्याला येत आहे. तुम्हाला जीवनात स्थिर करण्यासाठी त्याचे प्रयत्न होऊ शकतील. आता नोकरी असो की कारखाना असो. शेती असो की व्यापार असो. तुमच्या भोवती अडचणीचे, अस्थिरतेचे, उभे असलेले डोंगर ही रवी-मगळाची जोडी झपाट्याने दूर करणार आहे. रवीवार ते गुरुवार अनेक प्रकारच्या समस्या सुटू शकतील. नोकरीतील अस्थिरतेचे व अनिश्चिततेचे वातावरण बाजूला होऊन तुम्हाला निश्चित दिलासा मिळेल. कित्येकाची अडचणीच्या ठिकाणाहून अपेक्षित जागी बदली होईल. बेकाराचा वनवास सपला जाईल. अनेकांच्या आशा-आकांक्षा पालव-णारा काळ यावेळी सुरू होईल. महिलाच्या मनात उत्साह सचारेल. नोकरीत प्रमोशन. शुभराशी ४–८–९

### मकर : प्रभाव वाढेल.

तुमची प्रवृत्ती शासनात अधिकार गाजव-णारी व राजकारणात विरोधकाविरुद्ध सतत राजकारण खेळणारी आहे. या आठवड्यात रवी हा ग्रहराज्यातील सर्वांत श्रेष्ठ ग्रह तुमच्या राशीत दि. १४ ला प्रवेश करीत आहे. ही तुमच्या लोकविलक्षण कर्तृत्वाची नांदी ठरावी. तुम्ही आजवर जे जे नुसते मनात ठरवीत होता त्याची पूर्तता करण्याचा हा एक असामान्य योग आहे. तुमची राज-कारणात लोकप्रियता व प्रभाव वाढेल हे खरेच आहे, पण त्याचबरोबर बाराव्या मगळामुळे तुमचे अदाजदेखील चुकणार आहेत नोकरी व धदा करणाऱ्यांनी कोणतेही धाडस अवश्य करावे पण अवधान सुटू देऊ नये. सरकारी नोकरांनी लाच घेण्यापासून कटाक्षाने दूर रहावे. महिलाच्या सार्वजनिक सेवेचा गौरव होईल. शुभराशी २–८–११.

### कुंभ : सावध रहाण्याची गरज

कुभ राशीच्या व्यक्तीना गुरुचे असामान्य तेज व शनीचे वैभवशाली कर्तृत्व मिळाले आहे. त्यामुळे त्यांच्या विजयी यशाची कमान अजून तरी चढतीच राहील. मध्ये थोडा उतार झाला तरी अखेरीस इच्छित ध्येय व त्यांचा हेतू परिपूर्ण झाल्याखेरीज राहाणार नाही याबद्दल त्यांनी निश्चित असावे. या आठवड्यात रवी बारावा होत आहे व मगळ मात्र धैर्य देत आहे. फक्त तुमच्या अवती-भवती विरोधकांचे बेत काय व कसे चालू

पृष्ठ २८ वर

रंगभूमी

# समीक्षेविषयी

□ माणूस साप्ताहिकाच्या अगदी अलीकडच्या अंकात, श्री. वि. भा. देशपांडे यांनी, राज्य नाटयस्पर्धेत पुणे येथे झालेल्या नाटयप्रयोगापैकी काही नाटयप्रयोगाचा परामर्श घेतला आहे. त्या लेखाच्या निमित्ताने काही विचार मांडीत आहे.

श्री. देशपांडे गेली दीड–दोन वर्षे ' माणूस 'मध्ये लिहीत आहेत. काही प्रसंगी त्यांनी माणूसकरिता ग्रंथ परीक्षण केले असले तरी नाटक, नाटयप्रयोग व रंगभूमीविषयक इतर प्रश्न यासंबंधी त्यांनी अधिक व नियमीत लेखन ' माणूस 'मध्ये केले आहे.

मराठी वृत्तपत्रे, साप्ताहिके व मासिके यातून रंगभूमीविषयक लिहिला जाणारा मजकूर हा रंगभूमी आणि रंगभूमीविषयक इतर प्रश्नाबाबत असलेले समीक्षकाचे अज्ञानच सर्वसाधारणपणे दर्शवीत असतो. मराठी नाटय समीक्षकांचे रंगभूमीविषयक अज्ञान जाणवले म्हणजे मन उदास होते. कारण केवळ नाटके व नाटयप्रयोगाचा दर्जा सुधारल्याने रंगभूमीचा दर्जा सुधारणार नाही. वाचक, प्रेक्षक व नाटककार–प्रयोगकर्ते या दोन्ही घटकाना ज्याचे सहाय्य आवश्यक असते तो समीक्षक काय लिहितो यावरही रंगभूमीचा दर्जा कसा आणि किती सुधारतो ते अवलंबून आहे. याचाच अर्थ, समीक्षकांनी रंगभूमी समजावून घेतली पाहिजे. त्यासाठी अभ्यास केला पाहिजे व लिहिताना आपली जबाबदारी ओळखून लिहिले पाहिजे.

श्री. वि. भा. देशपांडे याच्या उपरिनिर्दिष्ट लेखातील मताशी मला इथे कर्तव्य नाही. नाटके व नाटयप्रयोग या बाबतीत स्वत:ची स्वतंत्र मते व्यक्त करणे हा त्यांचा अधिकार आहे. परंतु रंगभूमीविषयक अज्ञान आमच्या गळी उतरविण्याचा त्याचा प्रयत्न दिसतो. वाक्यरचनेतील विस्कळीतपणाही त्यांच्या लेखात जाणवण्या इतका आढळतो. श्री. देशपांडे यांची विधाने उद्धृत करून, कंसामध्ये त्या विधानांवरील मी आपले भाष्य करीत आहे. माझ्या शंका लिहीत आहे.

### महानिर्वाण

१ : ' एका सामान्य माणसाच्या मरणाची ( प्रेताची ) आणि मरणानंतरची कथा नाटकात आहे. '–( मरणाची म्हणजे प्रेताची काय ? मग ' मरणानंतरची ' म्हणजे काय? )

२ : ' त्यातील निरर्थकत्व जाणून घेणारा ' ( त्यातील म्हणजे मरणातील निरर्थकत्व ? तो सामान्य माणूस मरणातील निरर्थकत्व जाणून घेतो आहे असे नाटयलेखनात व प्रयोगात दिसते काय ? )

३ : ' पण दुसऱ्या अंकात नाटयविषयाचा विकास नित्य सावादिक रचनेमुळे सर्वसामान्य कथेवर आला. ' – ( सर्व सामान्य कथेवर आलेल्या नाटयविषयाचा ' विकास ' झाला असे म्हणावे काय ?–सर्व सामान्य कथेवर पहिल्या अंकात आला नाही तो काय नित्य सावादिक रचना नव्हती म्हणून ? )

४ : ' ...बारकावे कोरण्यात अधिक वेळ खर्ची पडल्याने मूळ नाटयविषयापासून नाटक खूपच दूर गेले. '–( मरणाची व मरणानंतरची कथा हा नाटयविषय होता काय ? त्याचे विधान क्रमांक १ पहा. )

५ : ' नाटककाराने संगीताचा वापर विविध पद्धतींनी करून घेतला आहे. ' – ( नाटककाराने संगीताचा वापर केला आहे की विविध गीत–प्रकारांचा ? )

६ : ' प्रयोग परिणामाच्या दृष्टीने विविध प्रकारचे संगीत प्रभावी ठरले. '–( हे कोणते संगीत ?–नाटककाराने वापरलेले की संगीत–दिग्दर्शकाने योजिलेले ? संगीताचे विविध प्रकार कोणते ? समीक्षकाला काय अभिप्रेत आहे ? )

### गोपा चांभाराची बकुळा

१ : ' मूळ नाटक लोर्कांचे ' दि शू मेकर्स प्रॉडिगल वाइफ ' असे आहे. '–( मूळ नाटक ' दि शू मेकर्स प्रॉडिजीअस वाइफ ' असे आहे. Prodigal आणि Prodigy यात किती फरक आहे ! )

२ : ' ... तितके त्यातले अंत:सत्त्व मात्र आलेले नाही. ' – ( स्पर्धेच्या प्रयोगावेळी, ' लोर्कांच्या नाटकाचा अनुवाद आपण सादर करीत आहोत ' असे नाटककार वा प्रयोगकर्ते यांनी सुचवले देखील नव्हते. त्यावेळी प्रेक्षकांना दिलेल्या माहितीपत्रात ' गोपा चांभाराची बकुळा ' असे नाव होते. )

३ : ' ... परस्परामधील प्रेम व्यक्त झाले नाही. अपत्यहीनतेतील सलणारे दुःख, म्हातारा नवरा आणि तारुण्य, स्त्रीत्व आणि अपत्यहीनत्त्व –( म्हणजेच पुन्हा अपत्यहीनतेतील सलणारे दुःख–फक्त शब्द निराळे ! ) यातील ताण, या सर्वांमधून ( असे कितीसे ' सर्व ' समीक्षकाने सांगितले ? ) आलेले एकाकीपण, व्यथा ( व्यथा येतात काय ? की जाणवतात ? होतात ? ) इत्यादी गोष्टी ( कोणत्या इत्यादी ? ) लेखनात स्पष्ट होऊ शकल्या नाहीत, '–( किती संदिग्ध आणि पोकळ लिहावे ? बरे, लेखनात स्पष्ट होऊ शकले नाही असे समीक्षक लिहितात ते अंत:सत्त्व आहे काय ? आणि ते अंत:सत्त्व मूळ नाटकात आले आहे असे समीक्षकाना खरोखरीच वाटते आहे का ? )

४ : ' संवादातून नाटयविषयातील जोश व्यक्त होत नव्हता. '–( म्हणजे हा नाटयविषय ' जोशपूर्ण ' होता काय ? )

५ : ' त्याच्या दिग्दर्शनात ... अशी गतिमानता होती. ' ( म्हणजे काय ? गतिमान–दिग्दर्शन ही काय कल्पना आहे ? )

६ : पहिल्या अंकाची गती जाणवण्या इतकी संथ वाटली. '–( दिग्दर्शनाचे स्वरूप गतिमान असूनही, पहिल्या अंकाची गती संथ वाटणार आहे हे दिग्दर्शकाच्या लक्षात येऊ नये ? )

७. ' मात्र दुसऱ्या अंकातील वेषांतर करून बहुरूप्याची भूमिका पवारांनी उत्तम कठविली '–(हे वाक्य कसे समजून घ्यायचे ? –' दुसऱ्या अंकातील बहुरूप्याची भूमिका ' हे ठीक आहे. ' वेषांतर करून ' हे शब्द कुणाबरोबर नाते सांगतात ?– )

### सरी ग सरी

१. ' छोटे पण चांगल्या अर्थाने लक्षात राहिले ते म्हणजे आळेकर ? छोटे हे कशाचे विशेषण आहे ? ' छोटया भूमिकेतच पण चांगल्या अर्थाने...' असे तर म्हणायचे नाही ? )

**आंतिगान**

१. 'जाँ अनुईच्या नाटकाचा अनुवाद...' (कोणत्या नाटकाचा ? त्याचा का उल्लेख नाही ? त्या नाटकातील अत.सत्त्वाचे काय ?')

२. '...त्यात कोणत्याच प्रकारे चढउतार निर्माण करण्याचा प्रयत्न नव्हता.'—त्यात म्हणजे प्रयोगात प्रयोगात. चढउतार निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजे काय ? बरे, तो गुण होता की ते वैगुण्य होते ?)

३. 'दिग्दर्शकाने नेपथ्यातील चौथऱ्यांचा उपयोग चांगला करून घेतला होता.' (कशासाठी ? कोणत्या अर्थाने ?)

४, 'पात्रांच्या विरचनेत नाविन्य असे काही नव्हते.'—(मग दिग्दर्शकाने चौथऱ्याचा चांगला उपयोग कसला केला ते तरी सांगा ! आणि विरचनेत 'नाविन्य' असावे लागते काय ? 'विरचनेतील नाविन्य' ही कल्पना स्पष्ट कराल काय ? विरचनेतले 'औचित्य व सौंदर्य' कळू शकते पण नाविन्य म्हणजे काय ?)

५.' .. नेपथ्य सूचक, आटोपशीर होते.' (ॲप्रन स्टेजची चर्चा केल्यावर आणि नेपथ्याचा वापर कसा केला ते पूर्वीच सागून झाल्यावर नेपथ्य कसे होते याची आठवण थोडया वेळाने कशी काय झाली ?)

६. '...प्रयोगापूर्वी जे एक माहितीपत्रक (फोल्डर)...'—(माहितीपत्रक हा शब्द वाचकाला कळणार नाही म्हणून शुद्ध देवनागरीत 'फोल्डर'?)

**भालचद्र पानसे यांचे नेपथ्याविषयी**

'...पण नेपथ्याने रगमचाची किती जागा व्यापावी आणि पात्राना वावरण्यासाठी किती जागा ठेवावी, याचा व्यावहारिक विचार..'

—(नेपथ्याची एक स्वतत्र जागा असते. आणि पात्रांना वावरण्यासाठी एक स्वतत्र जागा असते. अशा दोन कल्पना समीक्षकाच्या विधानातून पुढे येतात. श्री. पानसे याच्या त्या नेपथ्य रचनेत उणीवा होत्या. पण समीक्षक काही निराळेच सागत आहेत)

**समीक्षकाने केलेला समारोप**

'पहिली चार नाटके द्वितीय श्रेणीत...'

—(नाटके की नाटकाचे प्रयोग ?—'सहिता' व 'प्रयोग' यामध्ये फरक आहे हा नाटचसमीक्षेच्या अभ्यासातला पहिला घडा !)

तर अशी ही विधाने ! नाटच विषयक समीक्षा अधिक जबाबदारीने लिहिली जावी या हेतूने हे पत्र मी आपणास लिहिले आहे. आपण ते प्रसिद्ध करून वाचकासमोर विचारार्थ माडावे, ही विनती.

आपला,

**कृष्णकिरण वेलणकर, पुणे**

[स. न. श्री. वेलणकर यांचे पत्र वाचले. मी लिहिलेले नाटच परीक्षण त्यानी इतक्या आस्थापूर्वक वाचल्याबद्दल धन्यवाद त्याच्या शका बहुताश वाक्य रचनेबद्दलच्या आहेत. त्याबद्दल प्रत्येक वाक्य घेऊन सागावे लागेल. ते करण्याची मला आवश्यकता वाटत नाही. नाटचस्पर्धेतील नाटचप्रयोगांचे परीक्षण 'माणूस'मधून प्रसिद्ध झाल्यावर नाटच क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्तीनी ते परीक्षण स्वतःला मनापासून आवडल्याचे सांगितले. त्यामध्ये डॉ. प्रभुदास भुपटकर, वासुदेव पाळदे, डॉ. विद्याधर पुडलीक इ

श्री. वेलणकरानी समीक्षकाचे कर्तव्य आणि त्याच्याकडून अपेक्षित असणाऱ्या गोष्टी याबद्दल काहीबाही सागितले आहे, समीक्षेचा पहिला धडाही सागितला आहे, ते सारे उपयोगी पडणारे आहे. माझ्या परीक्षणातील काही वाक्यावर त्याचे भाष्य आहे, त्या भाष्यावर पुन्हा आणखी माझे भाष्य कशाला ?]

—वि. भा. देशपांडे

## साप्ताहिक भविष्य

पृष्ठ २६ वरून

आहेत याकडे डोळ्यांत तेल घालून जपा. सोमवार, मगळवार व गुरूवार नोकरीत स्वप्न पुरे होईल. प्रमोशन मिळेल. धद्यात प्रगतीची घटना घडेल. व्यापार नफ्याचा ठरेल प्रवासाचा योग येईल. महिलाना नोकरीत वरिष्ठ जागी बढती मिळेल. शुभराशी ५–६–११.

**मीन : विजयाची प्रसादचिन्हे**

राशीस्वामी गुरू आता लवकरच अनिष्टपणा सोडून तुमच्या वैभवशाली कर्तृत्वाला मदत करण्यासाठी राशीवर येणार आहे. या आठवड्यात रवी अकरावा झाला आहे ही एकच घटना अत्यत बोलकी आहे. मित्र हो तुमच्या मागची समस्याची, अडचणीची परिस्थिती धुक्यासारखी आता विरून जाणार आहे. धद्यात असलेली मंदी दूर होत जाणार आहे. तुमचा चालू धदा थाबल्यासारखा झाला होता तो आता पुन्हा तेजीत सुरू होईल. पैशाची व इतर मदत मिळेल. नोकरीत न्याय, स्थावर इत्यादी बाबतीत नेत्रदीपक विजयाची माळ तुमच्या गळयात पडणार आहे. वरिष्ठाकडून तुमच्या कामाची दखल घेतली जाईल. शनीवार, गुरूवार, शुक्रवार महत्त्वाचे महिलाचा सार्वजनिक कार्यात गौरव होईल. शुभराशी ४–६–१०.

□ □

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## पद्मनाभ !


### विजय तेंडुलकरांना पब्लिकसमोर पेश करणारा धडाडीचा दिग्दर्शक !

विजय तेंडुलकरांचं नाटकही तथाकथित इंटलेक्चुअल मराठी प्रेक्षकांच्या डोक्यावरून जातंच. मग तर हिंदी चित्रपटाच्या पब्लिक समोर तेंडुलकरांना पेश करण्याची छाती कोण करील ?

आमच्या पंडित सत्यदेव दुबेनी तेंडुलकरांचे गाजलेले नाटक ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' हे मराठीमधून पेश केले होते. त्यांना नाटकाचा सिनेमा बनवता आलाच नाही. त्यांना हे सांगूनही पटत नाही. पण, मराठी प्रेक्षकांनी तो सिनेमा पहाण्यापेक्षा नाटक पहाणे पसंत केले. इतर भाषेत म्हणजे अजय सहानीने एक तो पाहिला असल्याचे कळले एवढेच. बाकी कोणी आपण तो पाहिल्याचे खास म्हणत नाही.

एकूण तेंडुलकरांची स्टोरी आपल्या पब्लिकला समजायला कठीण जातेच. माझे मित्र विशु राजेही त्यांच्या ' श्रीमंत ' नाटकावर ' रईस ' नावाचं पिक्चर काढीत होते. पूर्ण झालं की नाही हे कळलं नाही. पण, सध्या विशु राजे दुसऱ्या एका पिक्चरचं काम करताहेत हे मात्र कळलं.

दिग्दर्शक पद्मनाभ यांच्या ' दो चोर ' च्या यशानंतर आणि गुरुदत्त फिल्म्सचे निर्माते आत्माराम यांच्या ' ये गुलिस्ताँ हमारा ',च्या अपयशानंतर पद्मनाभ पुन्हा गुरुदत्त फिल्म्सकडे आला. वास्तविक पद्मनाभ गुरुदत्त फिल्म्सचाच. कै. गुरुदत्त हयात होते त्यावेळी त्यांच्या तो हाताशी होता. त्यापूर्वी तो पूर्वीचे समाजवादी कामगार पुढारी आणि आताचे कॉंग्रेस खासदार राजा कुलकर्णी यांच्या हाताखाली होता. मी देखील होतो. राजा कुलकर्णी यांच्या वंडली कार्यपद्धतीला कंटाळून त्याने समाजवादी पक्ष सोडून कम्युनिस्ट पक्ष गाठला ( मी राजा कुलकर्णी यांची बंडलं खपवून घेत राह्यलो नी मग राजा कुलकर्णींनी आम्हा समाजवाद्यांच्या बावळटपणास कंटाळून, समाजवादी पक्ष सोडून कॉंग्रेस पक्ष गाठला ! ) पद्मनाभ कम्युनिस्ट झाल्यापासून माझा नी त्याचा संबंध तुटला. पण, तो कुठेतरी कामगारांचंच कल्याण करीत असणार याची मला खात्री होती. पुढे काही दिवसांनी आजचे मंत्री प्रभाकर कुंटे, पत्रकार वसंत प्रधान व कै. चंद्रकांत गुप्ते, मी शिवाजी पार्कवर बॅट, वॉल, स्टंपा जमवून क्रिकेट खेळू लागलो, त्यावेळी तोही आमच्या बरोबर होता. त्यावेळी कळलं की हा असामी कै. गुरुदत्त यांच्या हाताशी आहे. एकूण कामगारांच्या चळवळीत तो न राहिल्यामुळे दोन संप कमी झाले असतील, किंवा देशामध्ये कामगार राज्य येण्याची गती शंभर वर्षांमध्ये अर्धा इंच या प्रमाणात



हिप्पींच्या गोंधळात 'दो चोर'चे चित्रिकरण करीत असताना पद्मनाभ

कमी झाली असेल, पण, हिंदी चित्रपट सृष्टीला एक नव्या दमाचा दिग्दर्शक मिळाला हे काही कमी नाही.

कै. गुरुदत्तने ज्यावेळी सी. आय. डी. या चित्राचे काम आपला सहकारी राज खोसला याच्यावर सोपवले त्याचवेळी पद्मनाभलाही राज खोसलाकडे जायला सांगितले. त्यातंतर 'कालापानी' पासून 'वोह कौन थी' पर्यंत आणि 'चिराग' पासून 'मेरा गाव मेरा देश' पर्यंत राज खोसलाच्या प्रत्येक चित्राच्या क्रेडिट टायटल्समध्ये सहाय्यक दिग्दर्शक पद्मनाभचे नाव असायचेच. एकूण या माणसाने किती घासून घासून आपली अर्धी हयात संपवली असेल याची आपल्याला कल्पना येते.

आपल्या फिल्म इंडस्ट्रीमध्ये नेहेमीच काही लायक माणसे पुढे येतात असे नाही. फिल्म इंडस्ट्रीमध्ये बडचा प्रोडचुसरांची फॅमिलीही बडी. वाव मिळायचाच म्हणजे त्या फॅमिलीतल्याच कोणी मुलाला, जावयाला किंवा मेहुण्याला. म्हणजे सहाय्यक दिग्दर्शकाने आपली हयात जशी घासून घासून घालवली तशीच उरलेली अर्धी हयात सुद्धा घालवली पाहिजे. पण याबाबतीत पद्मनाभ तकदीरवाला ठरला. राज खोसलाने 'दो रास्ते' आणि 'मेरा गाव—मेरा देश' यांच्या ज्युबिल्या ठोकल्यावर, एखादे पिक्चर दुसऱ्यावर सोपवण्याची आयडीया केली होती. पण, त्याने ही जबाबदारी टाकण्यासाठी एखादा बोलू खोसला किंवा चालू खोसला पसंद केला नाही. पद्मनाभलाच पसंत केले. पद्मनाभचे आता पोट थोडेसे सुटले होते. थोडा जूनही झाला होता पण अद्याप केस काळेच तोपर्यंतच त्याला पिक्चर करायला मिळावे ही राज खोसलासाहेबांनी चांगलीच गोष्ट केली. नाहीतर क्रिकेटमध्ये आमच्या सी. के. नायडूंनी पन्नाशीपर्यंत होळकर संघाचे कॅप्टनपद संभाळले आणि मुस्तकअलीचे केस पिकू लागले आणि त्याला जेव्हां भारतीय संघामध्ये कोणी निवडणार नाही, त्यावेळी कर्णधार पदाची धुरा त्याच्यावर सोपवली. त्यामुळे पंचरंगी सामन्यात आपल्या कर्णधारपदाची चुणुक दाखवणारा हा धडाडीचा खेळाडू भारताचा कर्णधार मात्र कधीच होऊ शकला नाही.

'दो चोर' हे धंदा करणारे चित्र होते. धर्मेंद्रसारखा हँडसम हीरो, तनुजासारखी भरवशाची अदाकारी. आर. डी. सारखा संगीतकार, ग. रा. कामतांसारखा पटकथाकार. म्हणजे सर्व मसाला होताच. अर्थातच पद्मनाभने धंदा करणारे पिक्चर काढावे अशीच अपेक्षा होती. दिग्दर्शक म्हणून त्याचे नाव झाले नाही, तर त्याचा सी. एल. धीर किंवा अरविंद सेन (मर्यादा पूर्वीचा) व्हायचा. पिक्चर कसे चालेल यावर एकदा पद्मनाभशी किंवा फिल्मी दुनियेतल्या पद्माशी आणि आम्हा खास दोस्तांच्या पांडचा बांदोडकरशी गप्पा मारीत होतो. मी म्हणालो, 'पिक्चरला वेग हवा. पब्लिकला विचार करायला लागता कामा नये.' पद्मनाभने आपल्या पिक्चरला वेग चांगला ठेवतो हे कबूल केले. खरोखरच 'दो चोर' हे 'जंजीर', 'रामपूरका लक्ष्मण', 'जवानी दीवानी' ह्या काही फास्ट पिक्चरसारखे पिक्चर निघाले होते. 'धर्मेंद्र'ची हिरोगिरी, तनुजाची अदाकारी किंवा आर. डी. च्या गाण्याप्रमाणे, पद्मनाभचे दिग्दर्शक म्हणून त्यात काही कॉंट्रीब्युशन होते, ही एक खास गोष्ट होती. हिंदी चित्रपटातील यशामुळे,

पद्मनाभकडे दुसरी पिक्चर्स येऊ लागली. पण, सर्वात म्हणजे निर्माते आत्माराम यांनी गुरुदत्त फिल्म्स कबाईनला उचलून धरावे म्हणून पद्मनाभला हाक दिली. पद्मनाभला ब्रेख्तच्या ' गुड लेडी ऑफ सेझ्वां 'चे कथानक भावले होते आणि प्रत्येक मार्क्सिस्टाप्रमाणे विजय तेंडुलकर याचेही आकर्षण होते. त्याने विजयरावाना ' गुड लेडी 'च्या जागी ' गुड मॅन ' करून एक स्टोरी बनवण्याची आयडिया दिली आणि विजयरावानी त्याप्रमाणे ' इमान 'ची स्टोरी लिहून दिली.

पद्मनाभला आणखी एक धदा करणारेच पिक्चर काढायचे होते आणि विजयरावांची स्टोरी कितपत धदा करू शकेल याची आपल्याला शका होती. या माणसाचे एरवीचे लिहिणे जर भल्याभल्यांच्या डोक्यावरून जाते तर हिंदी पिक्चरच्या पब्लिकच्या डोक्यावरून गेले तर नवल नव्हते. एकूणच, ' इमान 'ची हवा काही बरी नव्हती. हिंदी पिक्चरच्या दुनियेत प्रत्येक पिक्चरची एक हवा असते. त्याप्रमाणे ' इमान 'विषयीही लोक बोलू लागले होते. ' काही दम नाही ' –लोक म्हणत. म्हणजे पद्मनाभने ' दो चोर ' नतर काही केले नाही. ' राज खोसला पोरीला घेऊन सेटवरून गायब झाला की सेट सांभाळणारा माणूस याच लायकीचा आहे पद्मनाभ ' एक पत्रकार मला म्हणालासुद्धा. मी मनात म्हणालो, ' तो दोष विजयरावांचा कशावरून नसेल. त्यांच्याच स्टोरीवरून ' रईस ' निघत होतं त्याचं काय झाल ? काही असो, पण विजयराव आणि पद्मनाभ ह्या कॉबिनेशनमध्ये काहीतरी घोटाळा झाला असावा असं ' इमान ' पहाण्यापूर्वी वाटत होते.

पण, ' इमान ' पाहिलं नी एकूण ' इमान ' विषयी पसरलेली हवा आपल्याला चुकीची वाटली. विजयराव आणि पद्मनाभ याच्या कॉबिनेशनमध्ये काहीही घोटाळा नव्हता. ' इमान 'ची स्टोरी प्रथम राजेश मुमताझच्या दुश्मनच्या लाईनवर जाते. एका गुन्हेगारावर ' इमान ' राखण्याची जबाबदारी, गावातले बदमाश व्यापारी, वंडल ग्राहक, इमली सारखी तीखी–खट्टी खुबसुरत बजारन लीना हा तोच फॉर्म्युला होता. परतु, हा इमान साभाळणारा सजीव राजेशसारखा कामयाब होऊन दोस्तचा दुश्मन होत नाही, तर तो स्वतःचा दुश्मन होऊन, आणि हरामखोरी करून कामयाब होतो. विजयराव शैलीतला हा एक पेचिदा सिलसिला होता. पण पद्मनाभने तो अत्यत सुगमतेने मांडला आहे. हिंदी पिक्चरच्या स्टाईलमध्ये अखेर हा भल्या–बुऱ्याचा सर्वांना समजण्याइतका आसान झगडा आहे. आणि अखेर सारा प्रेक्षक लीनाच्या रूपाने माणसाची भलाईच बुराईवर जिकणार अशा अपेक्षेत असतो. त्याच वेळी पद्मनाभ, आपल्याला झटका देतो. आणि आपल्या डोक्याला सतावू लागतो. हरामखोर व्यापारी पब्लिक, सजीवला बुराईच्या मार्गानेच जा–भलाईने जगू नकोस असे सांगते तर त्याच्यावर वफादारीने प्यार करणारी लीना म्हणते तू भलाईच्याच मार्गाने जा. बुराईने जगू नकोस. आणि त्यावेळी संजीव तुम्हाला विचारतो, " सागा मी कसा जगू ! "

आपल्या पब्लिकची पण हीच पोझीशन सध्या झाली आहे नाही का ? म्हणजे पद्मनाभने आपल्यासमोर पिक्चर पेश केले नाही–आयनाच पेश केला आहे ! पब्लिकने जर असा थोडा जरी विचार पिक्चर सपल्यावर केला तरी पद्मनाभने फार मोठे काम केले असे म्हणावे लागेल.

आणखी एक गोष्ट पद्मनाभने केली. या भलाई–बुराईच्या झगड्यामध्ये चार अफलातून कॉमेडीयन्सना पेश केले. जॉनी वॉकर, भगवान, केश्तो मुखर्जी नी मोहन चोटी. त्यांनी किती दिल बहलानेके अदाजसे पेश केली आहेत, हे प्रेस शोवेळी हसणाऱ्या पत्रकारानी दाद देऊन दाखवले. कॉमेडीयन्सना चागल्या रीतीने सांभाळणाऱ्या दिग्दर्शकाना आपण मानतोच.

¤ ¤


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०



राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. श्री. ग. माजगावकर

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे<br>श्री. ग. माजगावकर | १–०० |
| २. | पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ३. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ४. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ५. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ६. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ७. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७–०० |
| ८. | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७–०० |
| ९. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| १०. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |
| ११. | पूर्णिया | अनिल अवचट | ६–०० |
| १२. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १३. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | ८–०० |
| १४. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०–०० |
| १५. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०–०० |
| १६. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १७. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४–०० |
| १८. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५–०० |
| १९. | शतपावली | रवींद्र पिंगे | १०–०० |
| २०. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५–०० |
| २१. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे | २५–०० |
| २२. | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १०–०० |

**आगामी**

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | |
| २४. | मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे | |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३० : ५७३५९**